|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ५२ सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६ ते रविवार दि. ११ जानेवारी २०२६ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## प्रेमवीर बनून अधिकार गाजवायला गेला बारबालेच्या हातूनच 'इस्टेट एजंट' मेला

मुंबई : क्राईम रिपोर्टर

बारमध्ये काम करणाऱ्या मुलींचे तिथे येणाऱ्या ग्राहकांशी संबंध येतात. अशा बारबालांना फक्त पैसा हवा असतो. त्यासाठी त्या एकापेक्षा अधिक लोकांशी संबंध ठेवतात. पण काही लोकांचा मात्र असा समज असतो की त्या बारबालेचे आपल्यावर प्रेम आहे. त्यामुळे ते तिच्यावर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात. मात्र असे करणे कधीही धोकादायक ठरू शकते. बोरिवलीत अशाच एका घटनेत एक रियल इस्टेट एजंट बारबालेच्या प्रेमात पाडला ...पान २ वर

## साम-दाम-दंडामुळे विरोधकांवर माघार घेण्याची पाळी बिनविरोध नगरसेवक पदासाठी भाजपाची नवी खेळी






मुंबई : सोनू जाधव

सत्ताधारी भाजपने निवडणूक आयोगाला हाताशी धरून आतापर्यंत मतदान यंत्रातच हेराफेरी करून निवडणुका जिंकल्याचे विरोधकांकडून आरोप केले जात होते. पण बिनविरोध विजयाचा सुरत पेटर्ण आता महाराष्ट्रातही राबवला जात आहे. एखाद्या मतदार संघात साम-दाम-दंड-भेद नीतीचा अवलंब करून विरोधी उमेदवाराला माघार घ्यायला लावायची आणि आपला उमेदवार बिनविरोध निवडून आणायचा अशी रणनीती भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आखली होती. त्यामुळेच नगरपंचायत आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले. भाजपचे सर्वाधिक नगरसेवक आणि शंभराहून अधिक नगराध्यक्ष निवडून आले आणि आता तोच फॉर्म्युला आगामी २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीत वापरला जात आहे. त्यानुळे १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीपूर्वीच भाजपचे ४४ तर शिंदे गटाचे २२ आदी मिळून ७० नगरसेवक बिनविरोध निवडून आले. ही सरळ सरळ लोकशाहीची थट्टा आहे. जर अशाच पद्धतीने सर्व निवडणुकांमध्ये भाजपचे उमेदवार निवडून यायला लागले, तर लोकसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत विरोधी पक्षाचा एकही लोकप्रतिनिधी कुठल्याही सभागृहात दिसणार नाही. परिणामी भाजपला कधीही कुठल्याही क्षेत्रात मनमानी करायची मुभा मिळेल. मग असे असेल तर निवडणुका हव्याच कशाला? इंग्रजांप्रमाणे देशाची सर्व प्रशासकीय यंत्रणा भाजपने ताब्यात घ्यावी आणि जनतेवर अधिकृतपणे गुलामी लादावी, पण ज्या दिवशी लोकांच्या भावनांचा उद्रेक होईल आणि लोक रस्त्यावर उतरतील तेंव्हा जे नेपाळमध्ये झाले, जे श्रीलंकेत, बांगलादेशमध्ये झाले त्याही पेक्षा भयंकर भारतात घडेल.

आरक्षणाच्या चक्रव्युहात अडकलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हिरवा कंदील मिळाला. त्यामुळे डिसेंबर २०२५ मध्ये २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकांच्या पूर्वीच भाजपचे शंभरहून अधिक नगरसेवक विजयी झाले. त्या खालोखाल शिंदे सेना आणि अजित दादांनी बाजी मारली. जनतेतून थेट निवडले जाणारे सर्वाधिक नगराध्यक्ष सुद्धा भाजपचे निवडून आले. आणि आता २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीपूर्वी महायुतीचे ७० नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यात भाजपच्या सर्वाधिक ४४ नगरसेवकांचा समावेश आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे २२ नगरसेवक निवडून आलेत. कल्याण-डोंबिवलीत भाजपचे १५ तर शिंदेंच्या शिवसेनेचे ७ नगरसेवक बिनविरोध निवडून आलेत. भिवंडीत ६, धुळ्यात ४ जळगावमध्ये ६, अहिल्या नगर ३ आदी ठिकाणी मिळून महायुतीचे ७० नगरसेवक निवडून आले. १५ जानेवारी २०२६ला निवडणूक आहे. २८६९ जागांसाठी हि निवडणूक होणार आहे, पण प्रचाराला सुरुवात होण्यापूर्वीच ७० नगरसेवक निवडून आले, तर निकालापर्यंत म्हणजे १६ जानेवारीपर्यंत २००० नगरसेवक बिनविरोध निवडून आलेले असतील आणि अर्थात ते सर्व भाजपचे असतील हे वेगळे ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाने पती हैवान झाला पत्नी आणि मुलाचा निर्दयपणे खून केला



बुलढाणा : क्राईम रिपोर्टर

**संशयी माणूस कुटुंबासाठी धोकादायक असतो. कारण एकदा का त्याच्या मानेवर संशयाचे भूत बसले कि मग त्याच्या हातून काय घडेल याचा नेम नाही. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर शहरात राहणाऱ्या राहुल म्हस्के याचा त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. यातूनच त्याचे पत्नीसोबत भांडण व्हायचे. अखेर या भांडणाचा दुःखद शेवट झाला. राहुलने याच संशयातून पत्नीचा जीव तर घेतलाच पण चार वर्षाच्या मुलाच्या डोक्यात कुऱ्हाड घालून त्याचीही हत्या केली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीला अटक केली आहे.**

बुलडाण्यातून एक मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. पतीने ४ वर्षाच्या मुलासह पत्नीची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना घडली आहे. चारित्र्याच्या संशयातून पतीने हे कृत्य केल्याचं सांगितलं जात आहे. पत्नी आणि चार वर्षाच्या मुलाची हत्या या दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण मेहकर शहर हादरून गेलं असून परिसरात भीती व हळहळ व्यक्त होत आहे. निर्दयी पतीला अटक करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्ह्याला हादरवून टाकणारी घटना मेहकर येथील शिक्षक कॉलनी, प्रभाग क्रमांक १ मध्ये घडली. या घटनेत रूपाली राहुल म्हस्के (वय ३०) आणि तिचा ४ वर्षीय मुलगा रियांश राहुल म्हस्के यांचा मृत्यू झाला आहे. तर आरोपी पतीचे नाव राहुल हरी म्हस्के (वय ३५) असं आहे. मेहकर पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हल्ल्यात रियांश हा मुलगा जागीच मृत्युमुखी पडला, तर गंभीर जखमी झालेल्या रूपाली यांना शेजाऱ्यांनी तात्काळ एका खाजगी रुग्णालयात दाखल केलं. पण खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर रुपाली यांना छत्रपती संभाजीनगर इथं हलवण्यात आलं होतं. पण वाटेत जालन्याजवळ पोहोचले असता त्यांचा मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे. राहुल म्हस्के, त्याची पत्नी रूपाली, मुलगा रियांश, वडील हरी गोविंद म्हस्के, ...पान ६ वर

## फटाक्याचा वाद वाढवून चूक केली दिवाळीतच आयुष्याची होळी झाली






बुलढाणा : क्राईम रिपोर्टर

**दिवाळीत फटाके फोडण्यावरून अनेक वेळा वाद झालेत आणि या वादात काहींना आपला जीवही गमवावा लागलाय. जळगाव जिल्ह्यातील जामोद शहरात फटाके फोडण्यावरून अमोल हिस्सल याचा शुभम ताडे व योगेश जामोद ताडे यांच्याशी वाद झाला. हा वाद इतका वाढला कि शुभम व योगेशने मिळून अमोलला बेदम मारहाण केली आणि याच मारहाणीत अमोलचा मृत्यू झाला. दिवाळीच्या दिवशीच अमोलच्या आयुष्याची प्राणज्योत मालवली.**

जळगाव जामोद शहरातील संत रूपलाल नगरमध्ये हिरामण हिस्सल यांचे कुटुंब रहाते. त्यांना तीन मुले आहेत, तीनही मुले पुण्यात कंपनीत काम करतात, त्यांचे कुटुंब जुन्या वस्तीतून रूपलाल नगरमध्ये काही वर्षापूर्वी रहायला आले होते. दिवाळीचासण सर्वांनी कुटुंबासोबत साजरा करावा या हेतूने पुण्यात काम करणारे त्यांची मुले अतुल, अमोल आणि विनय हे तिघे दि. २० ऑक्टोबर २०२५ रोजी जळगाव जामोद येथे आले होते. दिवाळीसाठी कपडे, फराळ, ...पान २ वर

## दागिन्यांच्या लोभापायी मैत्रीचे नाते तुटले तृतीयपंथीची हत्या करून मित्राने सर्व लुटले

सोलापूर : इरप्पा बोरीकरजगीकर






**महाराष्ट्रात तृतीयपंथी लोकांच्या हत्येच्या ज्या घटना घडल्या आहेत. त्या लैंगिक संबंधातूनच घडल्या आहेत. पण सोलापुरात राहणाऱ्या एका तृतीयपंथीची वेगळ्याच कारणावरून त्याच्या मित्राने हत्या केली. सोलापुरात राहणारा आयुब हुसेन सय्यद आणि लातूर मध्ये राहणाऱ्या अल्ताफ शेख यांची मैत्री होती. तृतीयपंथी आयुबकडे बराच पैसा आणि दागिने होते. त्यावर अल्ताफचा डोळा होता. त्यातच आयुब निवडणुकीच्या राजकारणात उतरणार असल्याचे अल्ताफला समजले. त्यामुळे तो नाराज होता. अखेर त्याने आपल्या साथीदारांच्या सहाय्याने आपला मित्र आयुब याची हत्या केली. मात्र पोलिसांनी कसून तपास करीत अल्ताफ व त्याच्या साथीदारांना लातूर मधून अटक केली.**

सोलापूर शहराच्या सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीतील उत्तर बाजार परिसरा जवळ असलेल्या पेंढारी मज्जिदच्या पाठी मागे मुर्गी नाला येथे आयुब हुसेन सय्यद या तृतीयपंथीचे दुमजली घर आहे. या घराचा परिसर नेहमीच गजबजलेला असतो. बहुतांशी स्लम एरिया असलेल्या या परिसरात आयुब हुसेन सय्यद या तृतीयपंथीचे बरेच वर्चस्व होते. दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास या परिसरात एकच खळबळ उडाली. तृतीयपंथी आयुब सय्यद यांच्या घरी ...पान २ वर

## जमिनीच्या वाटणीवरून मोठा वाद पेटला थोरल्या भावाने धाकट्याचा जीव घेतला

हुक्केरी : क्राईम रिपोर्टर



**आजकाल माणूस इतका स्वार्थी झाला आहे की धन संपत्तीच्या वादात रक्ताची नातीही त्याला दिसत नाहीत. त्यामुळेच रक्ताच्या नात्यातच रक्ताचे पाट वाहतात. हुक्केरी तालुक्यातील बसापूर येथेही अशीच भयंकर घटना घडली. वडिलांच्या निधनानंतर जमिनीच्या वाटणीवरून सिद्धाप्पा आणि बसलिंग या दोन भावांमध्ये वाद होता. हा वाद मिटवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला, पण वाद मिटत नव्हता. दोन्ही भावांच्या मनात सुडाची भावना होती. एके दिवशी बसलिंग याने दारूच्या नशेत सिद्धाप्पा याला शिवीगाळ केली. त्यामुळे चिडलेल्या सिद्धाप्पाने लाकडी दांड्याचे प्रहार करून बसलिंग याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

हुक्केरी तालुक्यातील बसापुर येथे सिध्दाप्पा विठ्ठल रामापुरे आणि बसलिंग विठ्ठल रामापुरे हे दोघे राहयला आहेत. त्याच्या वडिलांचे गेल्या पाच वर्षापूर्वी निधन झाले होते. त्याची आई रत्तन्नवा ही वयोवृध्द झाल्याने ती दोन्ही मुलांच्याकडे आलयून पालटून राहत होती. रामापुरे याच्याकडे वडिलार्जीच चार एकर शेती ...पान २ वर

## एकतर्फी प्रेमात 'एक फूल, दो माली' प्रेमाच्या त्रिकोणाची शोकांतिका झाली




सांगली : क्राईम रिपोर्टर

**एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत. तोच प्रकार प्रेमात आहे. एका मुलीवर भलेही दोघांचे प्रेम असले तरी ती दोघांशी संबंध ठेवू शकत नाही किंवा लग्न करू शकत नाही. मात्र अशा प्रेमाच्या त्रिकोणातून तिच्यावर प्रेम करणाऱ्या दोन तरुणांमध्ये दुष्मनी होते आणि कधी कधी या दुष्मनीचा रक्तरंजित शेवट होतो. सांगलीत अशाच एका घटनेत एका मुलीवर विष्णू आणि आर्यन या दोघांचेही प्रेम एकतर्फी होते. त्यावरून दोघांमध्ये दुष्मनी झाली. याच दुष्मनीतून विष्णूने आर्यनवर हल्ला करून त्याला जखमी केले होते. या प्रकरणात विष्णू आणि त्याच्या साथीदारांना तुरुंगवासही झाला. मात्रसुडाने पेटलेला विष्णू तुरुंगातून सुटून येताच आर्यनची आपल्या साथीदारांच्या मदतीने हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

विष्णु सतिश वडर हा २३ वर्षीय तरूण सांगली शहरातील वडर गल्लीत राहयला आहे. त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने त्याचे वडिल मोलमजुरी करीत असतात.त्यातच विष्णु याचे कॉलेजचे शिक्षण ही चालू आहे. विष्णु हा तरूण असल्याने त्याच्या मनात ही ...पान २ वर

## मुल होत नसल्याने वादाची ठिणगी पडली पतीनेच पत्नीच्या आयुष्याची दोरी तोडली

पुणे : क्राईम रिपोर्टर

**लग्नानंतर प्रत्येक माणसाला वाटत असते की आपल्या संसाराच्या वेलीवर एकतरी फुल उमलावे, पण जेंव्हा तसे होत नाही तेंव्हा पती आणि समाजही बाईलाच दोष देतो. पुरुषातले दोष लपवले जातात. पुण्याजवळच्या फुरसुंगीमध्ये राहणाऱ्या आकाश व प्रियांका या दांपत्याला मुल नव्हते. त्यामुळे आकाश दारू पिवू लागला. दारूच्या नशेत प्रियांकाला दोष देत तू वांझोटी आहेस असे म्हणून मारहाण करू लागला. त्यामुळे प्रियांका सुद्धा त्याच्या मार्दांगीवर बोट ठेवून तुझ्यातच दम नाही असे म्हणून त्याला हिणवू लागली. त्यामुळे चिडलेल्या आकाशने प्रियांकाची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आकाशला अटक केली आहे.**

फुरसंगी जवळील भेकराईनगर गुरूदत्त कॉलनी येथे आकाश विष्णू दोडके हा पत्नी प्रियांकासह राहयला आहे. त्याचे प्रियांकासोबत सन २०१८ मध्ये लग्न झाले. प्रियांकाचे माहेर दौंड तालुक्यातील नानगाव आहे. त्याच्या लग्नाला सात वर्ष झाली तरी त्यांना अद्याप मुलबाळ झाले नाही. आकाश दोडके याचे आई वडिल आणि भाऊ हे सिंहगड रोड परिसरात राहयला आहेत. आकाश दोडके हा एका खाजगी वाहनावर ड्रायव्हर म्हणून काम करतो. त्यामुळे तो सारखा बाहेरच फिरतीवर असतो. त्यातच त्याला दारू पिण्याचे व्यसन लागल्याने तो रोज दारू पित होता. कामावरून घरी येताना तो ...पान ६ वर

## झालेल्या अपमानामुळे दिनेश सुडाने पेटला मारहाणीचा बदला त्याने मैत्री करून घेतला






जळगाव : ललीत खरे

**कोणताही माणूस आपला झालेला अपमान कधीच विसरू शकत नाही, त्याच्या मनात सुडाची भावना असते. जळगाव जिल्ह्याच्या शिर्सोलीत राहणारा दिनेश चौधरी एका वित्तीय संस्थेत कामाला होता. त्याच संस्थेत काम करणाऱ्या एका तरुणीसोबत रोज दिनेश स्कूटरवरून वसुलीसाठी जावे लागायचे. मात्र त्या तरुणीवर एकतर्फी प्रेम करणाऱ्या निलेश कासार याला ते आवडत नव्हते. त्यामुळे एकेदिवशी त्याने दिनेश याला रस्त्यात अडवून मारहाण केली. याच मारहाणीचा बदला घेण्यासाठी आणि दिनेशच्या खात्यात असलेले लाखो रुपये लुटण्यासाठी दिनेशने पूर्वीचा अपमान विसरल्याचे नाटक करून निलेश बरोबर मैत्री केली आणि एके दिवशी त्याला दारू पाजून तो नशेत असताना त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

दिनेश चौधरी हा अवघा एकवीस वर्षाचा तरुण जळगाव तालुक्यातील शिरसोली या गावी रहात होता. शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक विद्यालयात विद्येचे धडे घेऊन तो सज्ञान झाला होता. वयाची विशी ओलांडताच दिनेशला जामनेर तालुक्यातील एका वित्त संस्थेत फिल्ड क्रेडीट असिस्टंट या पदावर नोकरी मिळाली. ग्राहकांना कर्ज देणाऱ्या वित्त संस्थेत दिनेशची नोकरी व्यवस्थित सुरु होती. दिनेश नोकरी करत असलेल्या वित्त संस्थेत काही दिवसांनी ...पान ६ वर

पान १ वरून...

## प्रेमवीर बनून अधिकार गाजवायला...

होता. मात्र नंतर तो तिच्यावर अधिकार गाजवू लागताच तिने त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बारबालेला अटक केली आहे. स्वभाव न पटल्यामुळे बोरिवलीमध्ये बारबालाने एका व्यक्तीचीच थेट हत्या केली आहे. बारबालाच्या खासगी आयुष्यामध्ये ढवळाढवळ करणाऱ्या आणि तिच्यावर जास्त अधिकार गाजवणाऱ्या व्यक्तीची बारबालाने हत्या केली आहे. त्या व्यक्तीच्या स्वभावाला कंटाळून तिने थेट त्याची हत्याच केली आहे. हत्या करण्याचा कट रचला, बोरिवलीत त्याच्यावर चाकूने अमानुष हल्ला केला. बारबाला रिटा आणि तो व्यक्ती जेव्हापासून अंधेरीमध्ये भेटलेय, तेव्हापासून ते अनेक वर्षांपासून एकमेकांना चांगलेच ओळखत होते. त्या दोघांचीही पहिली भेट अंधेरीतल्या एका बारमध्ये झाली होती. तेव्हापासून ते एकमेकांना ओळखत होते. २६ डिसेंबर रोजी पहाटे बोरिवली स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्रमांक ०३ च्या बाहेर ४४ वर्षीय रियल इस्टेट व्यावसायिकावर त्या व्यक्तीने चाकून हल्ला केल्याचे पोलिसांनी सांगितले. बारबाला त्या व्यक्तीच्या पोटात दोनदा आणि हातावर एक वार केला. त्याला मृत समजून ती बारबाला घटनास्थळावरून पळून गेली, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. हल्ल्यानंतर, जखमी व्यक्तीने बोरिवली पोलिस स्टेशन गाठले, त्यानंतर कर्तव्यावर असलेल्या पोलिस अधिकाऱ्याने त्याला उपचारासाठी शताब्दी रुग्णालयात नेले. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान असे दिसून आले की, बारबाला रिटा तिच्या व्यवसायामुळे अनेक लोकांना ओळखत होती. याचा त्याला फार राग येत होता. तो तिला इतर कोणत्याही माणसाला भेटून देत नव्हता, तिने इतर कोणासोबतही शरीर संबंध ठेवलेले त्याला आवडत नव्हतं. या गोष्टीसाठी तो तिला दबाव आणायचा. ज्यामुळे त्या दोघांमध्येही वारंवार वाद होत होते. जेव्हा त्या व्यक्तीला बारबाला रिटाचे परपुरूषाशी जवळचे संबंध आहेत, असं कळलं. तेव्हा त्याने त्याला फोन करून तिच्यासोबत कोणतेही संबंध ठेवू नको, असं सांगितलं होतं. याचाच राग मनात ठेवून बारबाला रिटाने त्या व्यक्तीवर हल्ला केला. बारबाला रिटाने मनात राग ठेवून, रिटाने तिच्या चुलत भावाला आणि इतर दोघांना त्याला मारण्यास सांगितले. त्या तिघांनीही त्याच्यावर चाकूने सपासप वार केले. दरम्यान, पोलिसांनी त्या व्यक्तीचा जबाब नोंदवून घेतला आहे. पोलिसांनी बारबाला रिटासह तिच्या चुलत भावावर आणि त्याच्या अन्य साथीदारांवर भारतीय न्याय संहिता अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला.

## साम-दाम-दंडामुळे विरोधकांवर माघार...

सांगायची आवश्यकता नाही. याला निवडणूक म्हणायची का? देशाच्या निवडणुकीच्या इतिहासात अशा निवडणुका आजवर झाल्या नव्हत्या, पण शेवटी 'मोदी है तो मुमकिन है' असे म्हटले जाते ते काही चुकीचे नाही. या बिनविरोध निवडणुकांच्या रहस्याचा काही खोजी पत्रकारांनी शोध घेतला असता जे काही समोर आले ते भयंकर आणि लोकशाहीसाठी चिंताजनक होते. असे बोलले जाते कि आपला उमेदवार बिनविरोध निवडून यावा म्हणून विरोधी उमेदवाराला माघार घेण्यासाठी ५ कोटींची ऑफर देण्यात आली होती. ज्यांनी हि ऑफर स्वीकारून माघार घेतली त्याचा जीव वाचला आणि ज्याने नकार दिला त्याच्यावर इडी किंवा अन्य तपास यंत्रणांच्या धाडी टाकण्याची धमकी देण्यात आली आणि तरीही कुणी ऐकलं नसेल तर त्याचा बाळासाहेब सरवदे करण्याची तयारी करण्यात येणार असल्याचे समजते. हे सर्व भयंकर आहे. या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रारी करण्यात आल्यानंतर निवडणूक आयोगाने चौकशीचे आदेश दिलेत. पण लोकांचा निवडणूक आयोगावारच विश्वास नसल्याने ही चौकशी म्हणजे 'उंदराला मांजराची साक्ष' अशातला प्रकार आहे. आता काही होणार नाही पुढील काही दिवसात भाजपा आणि सत्ताधारी महायुतीचे आणखी काही नगरसेवक निवडून येतील. याबाबत कोणालाही आश्चर्य वाटू नये. पण ज्या मतदार संघातून बिनविरोध उमेदवार निवडून जात आहेत, त्या मतदार संघातील मतदारांचे काय? राजकारण्यांच्या लेन देनच्या व्यवहारात त्यांनी आपल्या मतदानाच्या हक्कावर पाणी सोडायचे का? कारण एकाच वेळी महायुतीचे आणि खास करून भाजपचे उमेदवार सोडून इतर सगळेच उमेदवार कशी माघार घेतात? हेच काही काळात नाही आणि कळणारही नाही. आणि हे असेच सुरु राहिले तर निवडणूक हा धंदा होईल. यापुढे कुणीही निवडणुकीला उभा राहील आणि सत्ताधारी पक्षाचे लोक त्याला पैसे देवून माघार घ्यायला लावतील. अशा स्थितीत विरोधी पक्षाचे अस्तित्वच शिल्लक राहणार नाही. त्यामुळे बिनविरोध निवडून जाण्याच्या या प्रकाराकडे मतदारांनी गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाकडे काय दाद मागायची कारण निवडणूक आयोगाची विश्वासआहार्ताच संपुष्टात आलीय. आता न्यायालय हाच शेवटचा उपाय लोकांनी न्यायालयातच याबाबत दाद मागावी.

## फटाक्याचा वाद वाढवून चूक ...

फटाके खरेदी झाली होती. सर्व कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. दि. २१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळी सणाच्या सायंकाळी संपूर्ण जळगाव शहरात फटाक्यांची आतिषबाजी सुरू होती. अमोलहिस्सल फटाके फोडत होता. रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान जुन्या वस्तीत जाऊन फटाके फोडावे असे वाटल्याने पाचशे मीटर अंतरावर असलेल्या जुन्या वस्तीत फटाके घेऊन गेला. तिथे त्याचे चुलत भाऊ व इतर नातेवाईक रहातात, पिंपळाच्या झाडाजवळ फटाके फोडत असताना, काही अंतरावर त्या वस्तीतीलच रहिवाशी असलेले योगेश ताडे आणि शुभम ताडे फटाके फोडत होते. त्यांनी अमोलला फटाके फोडतांना बघितले आणि खोडसाळपणा करण्यासाठी त्यांनी अमोलच्या अंगावर फटाके पेटवून फेकू लागले. त्यावेळी अमोल त्यांना माझ्या अंगावर फटाके टाकू नका असे म्हणत होता, पण ते दोघेही ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने अमोल आणि त्या दोघांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली. फटाक्यांच्या आतिषबाजीसह शिव्यांचीही आतिषबाजी होऊ लागली, शिवीगाळीचे रूपांतर हाणामारीत झाले. योगेश व शुभम यांनी अमोलला लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. तेवढ्यात त्यांचा मित्र ज्ञानेश्वर कोथळकर तेथे आला. त्यानेही अमोलसोबत वाद घालून त्याच्या कपाळावर वार केला. त्या तिघांच्या तावडीतून सुटका करून घेऊन अमोल सटकला. जवळच काकांचे घर असल्याने अमोल काकाच्या घरी गेला. काही वेळाने काकाच्या घरातून तो बाहेर पडला, पण त्याच्यावर पाळत ठेवून असलेल्य योगेशने अमोलला गाठले आणि पुन्हा वाद सुरू केला. त्यां अमोलचे डोके दोन्ही हातानी पकडून एका घरासमोरील ओट्यावर जोराने आपटले. तसेच शुभम आणि ज्ञानेश्वरनेही अमोलला बेदम मारहाण केली. दरम्यान, काही तरूणांचे अमोलसोबत भांडण होत असल्याची माहिती मिळाल्याने त्याचा भाऊ विनय धावत आला. त्याने भांडण सोडवले. दुचाकीवर एका नातेवाईकासह बसवून तेथून अमोलला घेऊन गेला. काही अंतरावर असलेल्या हॉटेलवर ते थांबले. डोक्यात वेदना होत असल्याने अमोल एका खुर्चीवर बसला. काही क्षणातच तो खुर्चीवरून पडलाते नेहमीसाठीच. त्याला भाऊ विनयने उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र अमोल कुठलाच प्रतिसाद देत नसल्याने त्याला तत्काळ स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले, कर्तव्यावर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अमोल यास तपासून मृत घोषित केले, अमोलचा मृत्यू झाल्याची बातमी समजताच त्याचे नातेवाईकांनी रूग्णालयात एकच गर्दी केली. फटाके फोडण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका तरूणाचा मारहाणीत मृत्यू झाल्याची खबर वाऱ्यासारखी शहरात पसरल्याने दिवाळीच्या रात्री एकच खळबळ निर्माण झाली, पोलिसांनी रूग्णालयात धाव घेतली. दुसऱ्या दिवशी शवविच्छेदन झाल्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अमोलवर अंत्यसंस्कार करण्यातआले. शवविच्छेदन करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी डोक्यात अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याने अमोलचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अभिप्राय दिला. मृतक अमोलचा भाऊ विनय हिस्सल यांच्या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलिसांनी संशयित आरोपी योगेश रामदास ताडे (वय २२), शुभम रमेश ताडे (वय २७), ज्ञानेश्वर पंडित - कोथळकर (वय २७) या तिघांवर अपराध क्रमांक ४९०/२५ कलम १०३(१), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सर्च ऑपरेशन राबवून आरोपींना तत्काळ ताब्यात घेतले, दुसऱ्या दिवशी स्थानिक न्यायालयासमोर उभे केले असता तिघांनाही वि न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली. आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत आहेत. न्यायालय आरोपींना काय सजा देईल ते येणाऱ्या काळात समजेल, मात्र फटाके फोडण्याच्या अगदी क्षुल्लक कारणावरून उद्धवलेल्या वादात क्रोधावर थोडे नियंत्रण ठेवले असते तर तिघांवर गजाआडहोऊन पश्चाताप करण्याची वेळ आली नसती, आणि एका युवकाचा भरदिवाळीच्या दिवशी नाहक बळी सुद्धा गेला नसता. या घटनेचा तपास बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन, जळगाव जामोद पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार निचळ विद्यमान ठाणेदार नितीन पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश मोहोड, मोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे, नागेश खाडे, अमोल पंडित, पोलीस हेड कॉन्स्टेबल उमेश शेगोकार वेरूळकर, सचिन राजपूत करत आहेत.

## दागिन्यांच्या लोभापायी मैत्रीचे ...

काम करणारी मोलकरीण नेहमीप्रमाणे काम करण्यासाठी आयुब हुसेन यांच्याकडे आली असता. आयुब हुसेन यांच्या दुसऱ्या मजल्यावर शांतता दिसत होती. नेहमी सकाळी उठून शेजारी पाजारी लोकांना संवाद करणारी आयुब सय्यद ही सकाळपासून घराबाहेर आली नसल्याचे सर्वांच्या लक्षात आले. बहुतेक ती उठली नसावी किंवा आजारी असावी असा समज परिसरात ही लोकांना झाला होता. दरम्यान नेहमीप्रमाणे काम करणाऱ्या बाईंनी अनुभूषण हात असलेल्या दुसऱ्या मजल्यावर प्रवेश केला. रूमचा दरवाजा बंद होता. क्या कामवाल्या बाईने आयुष्य यांना हाक मारत संवाद साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्या रूम मधून कुठलेही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे त्या कामवाल्या बाईने अलगद दरवाजा ढकलून मध्ये प्रवेश केला. केव्हा एका बेडवर आयुब हुसेन ही तृतीयपंथी निवांत निरीव पडलेली दिसली. कामवाल्या बाईने आयूब सय्यद यांना उठवण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्या कामवाल्या बाईने आजूबाजूला राहणाऱ्या शेजाऱ्यांना संबंधित प्रकार सांगितला. तेव्हा त्या गल्लीत राहणाऱ्या काही लोकांनी आयुब सय्यद यांच्या रूममध्ये जावून पाहणी केली. तेव्हा त्यांना आयुब सय्यद यांच्याशी काहीतरी विपरीत घडल्याचा संशय आला. त्यामुळे त्यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यांला संपर्क करून घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक भालचंद्र ढवळे यांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. मुर्गा नाला परिसरात पोलिसांची गाडी आली. मुर्गा नाला परिसरात असलेल्या आयुब हुसेन सय्यद यांच्या घराशेजारी लोकांनी बरीच गर्दी केली होती. गर्दीतून मार्ग काढीत पोलीस थेट आयुब रहात असलेल्या रूम मध्ये गेले. आयुब हुसेन यांचे जवळून निरीक्षण केले असता ते मृत्यूमुखी झाले असल्याचा प्राथमिक अंदाज पोलीसाकडून वरतविण्यात आला. सय्यद हुसेन यांचा घातपात की आत्महत्या या विषयावर लोकाकडून तर्क लावण्यात येऊ लागले. आयुब हुसेन सय्यद यांचा मृत्यू झाल्याची खबर सोलापूर जिल्ह्यात वाऱ्यासारखी पसरली. पण नेमका मृत्यू कशामुळे झाला याबाबत कोणालाही काही माहिती मिळत नव्हती. त्यामुळे आयुब हुसेन सय्यद यांच्या हितचिंतकांनी मुर्गा नाला परिसराकडे भाव घेतली. मुर्गा नाला परिसरात लोकांची तोबा गर्दी जमली. दरम्यान घटनेची माहिती मिळताच सीपी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, स्थानिक गुन्हे शाखेचे, पाटील, माने यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळा भेट देत त्यांनी घटनेची प्राथमिक माहीती जाणुन घेतली. सदर बाजार पोलिसांना योग्य त्या सुचना देवून पंचनाम्याचे आदेश दिले. पंचनामा करताना आयुब हुसेना रहात असलेल्या रूम मधील सामान बरेच असता व्यस्त पडलेले पोलिसांना दिसले. तसेच त्यांच्या कॉट शेजारी असलेल्या एका टेबलवर दारूच्या बाटल्या ही दिसत होत्या. यावरून आयुब सय्यद यांच्या रूममध्ये एकापेक्षा जास्त व्यक्तींचा वावर झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला. या सर्व बाबी वरून पोलिसांनी आयुब सय्यद याच्यासोबत काहीतरी घातपात झाला असावा असा संशय मनात बाळगून तपासाला सुरुवात केली होती. दरम्यान आयुब सय्यद वापरत आसलेली मोपेड गायब झाली आसल्याचेही पोलिसांच्या लक्षात आले. तसेच काही दिवसापूर्वीच उत्तर सोलापूर मधून आयुब हुसेन सय्यद यांनी महानगरपालिका निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. बहुतेक त्यांचा राजकीय वादातून कुणीतरी काटा काढला का याबाबत लोकांमध्ये उलट सुलट चर्चा चालू झाली होती पोलिसांनी ही बाब लक्षात घेवून त्या दिशेने तपासाला सुरूवातही केली होती. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करत आवश्यक ती माहीती हास्तगत केली. आयुब सय्यद यांचे प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्नालयात पाठविण्याची तजबीज केली. दरम्यान सरकारी फिर्यादीवरून अज्ञात करण्यासाठी अज्ञात लोकांनी आयुब हुसेन सय्यद याला मारल्याच्या तक्रारीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुरंन ११५६/२०२५ कलम १०३ भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत पोलिसांनी सर्व परिसर पिंजून काढला मात्र पोलिसांना आवश्यक असलेला कुठलाही पुरावा हाती लागला नाही. मात्र पोलिसांच्या एका पथकला एक महत्त्वाचा धागा हाती लागला. आयुब सय्यद राहत असलेल्या परिसरातील एक सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले. यावरून सोलापूर पोलिसांनी तपासाची दिशा ठरवत आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा आधार घेत तपासाला सुरुवात केली. यावरून पोलिसांनी तपासाची दिशा ठरवली. सोलापुर शहरात आसलेल्या प्रत्येक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज मधून काही पोषक माहिती मिळते का यासाठी पोलिसांची खटपट सुरू झाली. सायबर सेलच्या पोलिसांनी आपले कौशल्य दाखवत आयुब सय्यद खून प्रकरणात तपासाला गती देणारा पोषक पुरावा पोलिसांच्या हाती दिला. आयुब हुसेन सय्यद खून प्रकरणातील संशयीत आरोपी लातूर शहराच्या दिशेने गेले आसल्याची खात्रीलायक माहीती पोलिसांच्या हाती आली. सोलापूर पोलिसांनी तात्काळ पोलिसांचे एक पथक लातूरच्या दिशेने पाठविले. सोलापूर पोलिसांनी काही तासात लातूर गाठून विवेकानंद चौक पोलिसांची मदत घेतली. विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीत जवळ आसलेल्या पाण्याच्या टाकी परीसरात सापळ लावून इंदीर नगर भागात एका घरावर छापा मारून आफताब हुसेन शेख (रा. कुंभारवाडी तालुका रेनापुर जिल्हा लातूर), वैभव गुरुनाथ पनगुले (राहणार कुंभारवाडी तालुका रेनापुर जिल्हा लातूर) व यशराज उत्तम कांबळे (रा. इंदिरा नगर लातूर) या तिघांना ताब्यात घेतली त्यांना सोलापूर येथे हजर करत त्यांच्याकडे अधिक माहिती विचारली असता त्यांनी सुरुवातीला पोलिसांना अस समाधानकारक उत्तरे दिली. सोलापूर पोलिसांनी त्यांना अधिक विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असतात त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली घेऊन सांगण्यास सुरुवात केली. तृतीयपंथी आयुब सय्यद आणि अल्ताफ शेख हे जुने मित्र होते. अल्ताफ शेख लातूर वरून नेहमी सोलापूर येथे आयुब सय्यद यांच्याकडे जात होता. अल्ताफ शेख आणि आयुब सय्यद यांच्या चांगलीच मैत्री होती अधून मधून ते पार्टीही करत होते. दरम्यान काही दिवसांपूर्वी आयुब सय्यद हा सोलापूर महापालिका निवडणुकीत उमेदवारी दाखल करणार असल्याची माहिती अल्ताफ शेख याला माहीत होती. दरम्यान आयुब सय्यद याच्याकडे भरपूर पैसा ओळखा आणि सोने असल्याचेही अल्ताफ शेख याला ठाऊक होते. आयुब सय्यद याचा मागे पुढे कोणीही नव्हते. अल्ताफ शेख हा आयुब सय्यद यांच्या मालमत्तेवर आणि सोन्यावर डोळा ठेवून होता. आयुब सय्यद याला खल्लास करून त्याच्या अंगावरील अंदाजे पाच किलो सोने आणि रोकड पळवून नेण्याची युक्ती अल्ताफ शेख यांच्या मनात घर करून होती. अल्ताफ शेख याने त्याची युक्ती त्याचा लातूर येथील मित्र यशराज उत्तम कांबळे व वैभव गुरुनाथ पनगुले यांना बोलून दाखवली होती . यशराज कांबळे आणि वैभव पण घुले हे महाविद्यालयीन विद्यार्थी होते. मात्र ते गेल्या काही दिवसापासून बहुतेक सुखाच्या मागे लागले होते त्यामुळे त्यांना पैशाची गरज ही भासत होती अल्ताफ शेख यांनी दिलेली कल्पना या दोघांनाही पटली आणि त्यांनी हा कट शिजवण्यास सुरुवात केली. काही दिवसांपूर्वी यशराज कांबळे आणि अल्ताफ शेख हे दोघे सोलापूर येथे आयुक्त यांच्या भेटीलाही गेले होते. दरम्यान कट शिजवल्याप्रमाणे २६ डिसेंबर रोजी यशराज कांबळे वैभव पनगुले आणि अल्ताफ शेख हे तिघेजण यशराज कांबळे यांच्या युनिकॉर्न गाडीवरून लातूर वरून सोलापूरला गेले. रात्री साडेदहाच्या दरम्यान हे तिघे सोलापूर येथे आले. रात्री तिघे आयुब सय्यद याच्या रूमवर थांबले रात्री उशिरा पार्टीचा बेत केला. बेसावध असलेल्या आयुब सय्यद याचा काटा काढून त्याच्या कपाटातील सोने सदृश्य दिसणारे वस्तू, मोबाईल तसेच रोकड घेऊन हे तिघेजण खाली आले. तसेच आयुब सय्यद वापरत असलेली टू व्हीलर मोटरसायकल देखील घेऊन पलीयान केले. दरम्यान पोलिसांनी या खून प्रकरणातील तपास करताना आरोपीने वापरलेली मोटरसायकल सोन्या सदृश्य दिसणारे ऐवज जप्त केली असून या प्रकरणाचा पुढील तपास सदर बाजार पोलीस ठाण्याची वरिष्ठ पोलीस निरीक्षक ढवळे हे करत आहेत. ही कामगिरी सिपी पवार, डीसीपी विजय कबाडे, माने, डवळे यांच्या मार्गदशनाखाली धायगुडे, पाटील, शैलेश खेडकर, दत्ता काळे, पीएसआय मुकेश गायकवाड, शामकांत जाधव, पोलीस आमदार नंदराम गायकवाड, बापू साठे ,अंकुश भोसले, संदीप जावळे, जावेद जमादार, अनिल जाधव, विनोद राजपूत, महेश शिंदे, योगेश बरडे, शैलेश उघड, काशिनाथ वाघे, राजकुमार वाघमारे, आबाजी सावळे, संजय साळुंखे, कुमार शेळके, अभिजीत धायगुडे, राजकुमार पवार, इमरान जमादार, धीरज सातपुते, अजिंक्य माने, सय्यद, सुभाष मुंडे, वसीम शेख, राजू मुदगल, महेश पाटील, महेश रोकडे, राजेश मोरे, सिताराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, सागर काटे यांनी मालाची कामगिरी केली.

## जमिनीच्या वाटणीवरून मोठा वाद...

असून त्या शेतीवरच त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत होता. या चार एकर शेत जमीनीच्या वाटणीवरून दोघा भावात वडिल वारल्यापासून वाद चालू होता. या वादातून त्याच्यात मोठी भांडणे मारामाऱ्या ही झाल्या होत्या. या चार एकर शेतीची त्याच्यात तोंडी वाटणी झालेली होती.अजून कागदोपत्री वाटणी झालेली नसल्याने कुणी काय पेरायचे, कुणी किती पिकाची वाटणी घ्यायचे हे ठरत नव्हते. एखाद्या वर्षी शेतातील उत्तपन्न कमी झाले की पिकांच्या वाटणी हिस्स्शावरून दोघात भांडणे होत होती. या भांडणात दोघांच्या बायका तेल ओतण्याचे काम करीत होत्या. त्यामुळे त्याची भांडणे काही मिटत नव्हती. घरात देखील दोघे भाऊ त्या घरात एक विटाची पडदी लावून विभागुन राहत होते. त्याची ही समसमान वाटणी झालेली नव्हती. सिध्दाप्पा हा मोठा असल्याने तो वाटणी करताना कमी जास्त करीत असल्याचा राग बसलिंग याला येत होता. कधी तो घराची मागे पुढे तर कधी आडवी वाटणी करीत होता. ते बसलिंग याला पटत नव्हते. तशीच गत चार एकर शेताची झाली होती. चार एकर शेतात तो आपल्या आईची एक वाटणी धरत होता. त्यामुळे वाटणी करताना शेताची वाटणी कमी जास्त होत होती. त्यातच त्याची आई रत्तन्नवा ही दोघाकडे सहा सहा महिने राहत असल्याने तिच्या मरणानंतर तिची वाटणी शेवटी ती कोणाकडे राहत असेल त्यांना तिची वाटणी मिळणार असे दोघांना ही वाटत होते. खरे तर त्याच्या आईने त्यांना शेताची वाटणी ही समान करा असे सांगितले होते. परंतु जवळच्या पाहुण्यांनी दोघांना ही आईची वाटणी हिस्सा करा असे सांगितले होते. या वरून दोघा भावात धुसफुस चालू होती. त्यातच दोघांच्या ही बायकांच्या माहेरचे लोक त्याच्या वाटणीत लुडबुड करताना आपल्या जावाई लेकीला कशी जास्त वाटणी मिळेल हे पाहत होते. त्यामुळे दोघांची भांडणे मिटण्याऐवजी वाढतच होती. दोघांना ही दारू पिण्याचे व्यसन असल्याने दारू पिऊन घरी आले की एकमेकाला शिव्या घालत दोघे ही एकमेकांच्या अंगावर जात एकमेकांना हातात सापडेल त्या वस्तुने मारत होते. त्यात सिध्दाप्पाचा स्वभाव हा रागीट होता.त्याला प्रत्येक गोष्टीत राग लवकर येत होता. दोघे ही जवळपास वयाच्या ५०शीकडे आलेले होते. दोघांच्या ही मुलाबाळाच्या भविष्याचा प्रश्न होता.घराची आणि शेतीची वाटणी बरोबर झाली की दोघांना ही बरे होते परंतु दोघात वाटणीवरून कधीच एकमत होत नव्हते. घराची वाटणीत बसलिंग समाधानी होता कारण त्याला चांगला हिस्सा मिळालेला होता, परंतु शेताची वाटणीत मात्र त्याला मनासारखा हिस्सा मिळत नसल्याने प्रत्येक वेळी तो वाटणी करताना काही तरी कुरापत काढत वाटणी आपल्या मनासारखीच झाली पाहिजे असा हेका धरत होता. त्यामुळे वाटणी काही होत नव्हती.त्यातच सिध्दाप्पाला आपल्या मुलाचे लवकर लग्न करायचे होते. त्याने त्यासाठी मुली ही बघायला सुरूवात केली. एक दोन ठिकाणी लग्न जुळता जुळता मोडले होते. याला कारण म्हणजे त्याच्या वडिलार्जीत शेतजमीनीची वाटणी आणि घराची वाटणी ही अजून झालेली नव्हती. हल्ली लग्न करताना बऱ्याच ठिकाणी लिंगायत आणि जैन समाजात नोकरी पेक्षा त्याची शेतजमीन किती आहे हे प्रत्यक्ष त्या शेतीचा सात बारा उतारा बघुनच लग्न ठरत असते त्यामुळे सिध्दाप्पाच्या मुलाच्या लग्नात अडथळा येत होता. त्यामुळे त्याला लवकरात लवकर शेताची वाटणी व्हावी असे वाटत होते परंतु बसलिंग हा आपल्याला कमी हिस्सा मिळेल म्हणून तो त्याने केलेली वाटणी अमान्य करीत वाटणी होऊ देत नव्हता.या कारणातून दोघांची भांडणे वाढलेली होती. बसलिंग हा दारूच्या नशेत येवून रोज मोठा भाऊ सिध्दाप्पाला शिव्या घालत होता. त्याला उलट सुलट बोलत होता. १७ डिसेंबर २०२५ रोजी बसलिंग याने फुल्ल दारू पिली होती. दारू पिऊन येवून तो घरासमोर उभा राहून मोठया भावाला शिव्या घालत माझी वाटणी आताच्या आता दे.नाही तर तुझा मुडदा पाडतो असे कन्नड मध्ये म्हणत होता. बसलिंग याची बायको विणा हिने शिव्या देणाऱ्या नवऱ्याला गप्प करण्याचा प्रयत्न केला.आपल्याला लहान भाऊ शिव्या घालत असल्याचे बघून घरात बसलेला सिध्दाप्पा हा घरातून लाकडी दांडका घेऊनच बाहेर आला. तो ही त्याला कन्नडमध्ये शिव्या देत त्याच्या अंगावर गेला. त्याच लाकडी दांडक्याने बसलिंग याला मारहाण करीत त्याला खाली पाडले. बसलिंग याला मारहाण होत असताना त्याची पत्नी वीणा आणि आई सोडवायला पुढे आले.परंतु रागाच्या भरात असणाऱ्या सिध्दाप्पाला राग अनावर झालेला होता. त्याने त्याच रागाच्या भरात खाली पडलेल्या बसलिंग याच्या डोक्यात दगड घातला. त्या दगडाने बसलिंगच्या डोक्यात मोठा प्रहार झाल्याने बसलिंग याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्रवि सुरू झाला. त्याला रक्ताच्या थारोळयात सोडून सिध्दाप्पा हा रागारागाने आपल्या घरात शिव्या देत गेला. त्याच वेळी तेथे जमलेल्या भावकीतील लोकांनी गंभीर जखमी अवस्थेतील बसलिंग याला संकेश्वर येथील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी नेले. तेथे त्याचेवर उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी बेळगावी येथील दवाखान्यात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना दोन दिवसांनी बसलिंग रामापुरे यांचा मृत्यु झाला. या घटनेची माहिती यमकनमर्डी पोलीसांना समजताच त्यानी तातडीने बसापुर येथे घटनास्थळी दाखल होत या घटनेची माहिती घेतली. त्यावेळी सिध्दाप्पाने बसलिंग याच्या बायकोला म्हणजे वीणावर दबाव टाकला. तिला पोलीसांना माहिती देताना बसलिंग याचा घराच्या छतावरून पडल्याने त्याच्या डोकीला जबर दुखापत झाल्याने त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आल्यानंतर उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाल्याचे सांगण्यास भाग पाडले. त्यावेळी पोलीसांनी या घटनेची नोंद पोलीस दप्तरी बसलिंग विठ्ठल रामापुरे याचा मृत्यु ही आकस्मिक मृत्यु अशी केली.त्यामुळे थोडे वातावरण निवळल्यासारखे झाल्याचे सिध्दाप्पाला वाटले. परंतु इकडे दोघांची ही आई रतन्नवा हि घटना तिच्या जिव्हारी लागलेली होती.आपल्या मोठया मुलाने मारहाण केल्याने लहान मुलाचा मृत्यु झाल्याचे ती गावातील सर्वाना आणि नातेवाईकांना सांगत होती.त्यातच यमकनमर्डी पोलीस स्टेशनचे पो.निरी. जावेद मुशापुरी याच्या कानावर ही माहिती आली. त्यांनी या कामी आपल्या गुप्त बातमीद्वारे कडून या माहितीची खातर जमा करून घेतली. त्यांनी सुरूवातीला रतन्नवा यांना पोलीस स्टेशनला बोलावून घेत त्यांना विश्वासात घेतले. त्यावेळी रतन्नवा यांनी घडलेली संपुर्ण घटना पोलीसांना सांगुन मोठा मुलगा सिध्दाप्पाने केलेल्या मारहाणीत लहान मुलगा बसलिंग याचा मृत्यु झाल्याचे सांगितले. यावरून पोलीसांनी तातडीने हालचाल करीत सिध्दाप्पा रामापुरे याला ताब्यात घेतले. त्याला यमकनमर्डी पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलिसांच्या प्रश्नापुढे हतबल झाला. त्याने नाही होय म्हणत आपणच केलेल्या मारहाणीत बसलिंग याचा मृत्यु झाल्याचे पोलीसांना सांगितले. त्याला आपण का? आणि कशासाठी मारहाण केली हे ही त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यानंतर या घटनेची फिर्याद मयत बसलिंग याची बायको वीणा रामापुरे हिच्याकडून घेतली. फिर्यादीनुसार यमकनमर्डी पोलीसांनी बसलिंग विठ्ठल रामापुरे (४३) याच्या खून प्रकरणी त्याचा मोठा भाऊ सिध्दाप्पा विठ्ठल रामापुरे (४८) रा.दोघे ही बसापुर तालुका हुक्केरी जिल्हा बेळगावी. याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. यमकनमर्डी पोलीसानी सिध्दाप्पा रामापुरे याला हुक्केरी येथील कोर्टात उभे केले. मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला दगड आणि लाकडी दांडका जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.जावेद मुशापुरी यांच्या मार्गदर्शनाखाली यमकनमर्डी पोलीस करीत आहेत.

## एकतर्फी प्रेमात 'एक फूल...

प्रेमाच्या कोवळया भावना फुलत होत्या. त्याचे एका मुलीवर प्रेम होते. त्या मुलीला भेटण्यासाठी म्हणून विष्णु हा नेहमी कॉलेज रोडवर शायनिंग मारायला जात होता. खरे तर ती मुलगी त्याला काय भाव देत नव्हती. परंतु विष्णु हा नेहमी तिची एक झलक पाहण्यासाठी आपल्या मित्रासोबत शायनिंग मारत चकरा मारत होता.तो ज्या मुलीवर लाईन मारत होता. त्याच मुलीवर आर्यन पाटील लाईन मारत होता. तसे विष्णुची आणि आर्यनची ओळख ही नव्हती.आर्यन पाटील हा छायाचित्रकार म्हणून काम करीत होता. त्याच्या गळ्यात नेहमी कॅमेरा असायचा.तो छान छान फोटो काढत आपल्या कल्पकतेने त्याचेत जीव ओतत होता. तो छायाचित्रकार असल्याने नेहमी त्याचे कॉलेज पसिरात येणे जाणे असायचे. परंतु विष्णुच्या डोक्यात एकदा दोनदा विचार आला की, आपल्या आयटमवर दुसराच कुणी तरी ट्राय करीत आहे. हे त्याच्या लक्षात आल्यावर कॉलेज परिसरात त्या दोघांची भेट झाली की, दोघेही एकमेकाकडे रागाने पाहत एकमेकांना बघून घेण्याची भाषा करीत होते.त्यामुळे दोघात या कारणावरून वाद आणि भांडण ही झाले. हे भांडण काही मिटत ही नव्हते. दोघांच्या मनात एकमेकाबद्दल धुसफुस चालूच होती. विष्णुला आर्यनचा खुप राग येत होता. त्याने त्याला बऱ्याच वेळेला समजावून सांगितले की, तु माझ्या आयटमचा नाद सोड.परंतु आर्यन हा ही काही कमी नव्हता.त्याने ही त्याला चॅलेज दिले. या कारणातून मागील दीड वर्षापूर्वी म्हणजे १ जुलै २०२४ रोजी एन.एस.सोटी कॉलेजच्या गेटसमोर आपले मित्र पृथ्वीराज कलकुटगी आणि मंथन याच्यासोबत मिळून आर्यन पाटील बरोबर भांडण काढून त्याच्यावर चाकूने वार करीत त्याला जिवानिशी संपविण्याचा प्रयत्न केला. या घटनेत आर्यन पाटील हा गंभीर जखमी झाला. त्यावेळी त्यांनी त्याचा कॅमेरा ही फोडला.आपल्या वरील उपचारानंतर त्याने विष्णु वडर, पृथ्वीराज कलकुटगी,आणि मंथन याच्या विरोधात विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. या गुन्हयात विश्रामबाग पोलीसांनी विष्णु वडर, पृथ्वीराज कलकुटगी आणि मंथन यांना ताब्यात घेतले. त्यांना कोर्टासमोर पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना शिक्षा सुनावली. ही शिक्षा भोगून विष्णु वडर, पृथ्वीराज कलकुटगी आणि मंथन हे तिघे महिन्याभरात जामीनावर बाहेर आले. त्यानंतर ही आर्यन बरोबर विष्णु वडर याची दुश्मनी चालूच होती. दोघे ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा करीत होते.आर्यनच्या मनात मात्र आपल्यावर झालेला हल्ल्याचा बदला घेण्याचा विचार कायम घोळत होता. तो तसा डाव टाकूनच होता. आपल्यावर जेथे विष्णु वडर आणि त्याच्या मित्रांनी हल्ला केला तेथेच विष्णुची गेम करायची हे त्याने आपल्या मनात ठरवून ठेवलेले होते. तो तशा संधीच्या शोधात होता.दोघे ही समोरा समोर भेटले की, एकमेकांकडे रागाने बघत होते. विष्णु वडर हा अजुनही त्या मुलीच्या नादात कॉलेजच्या गेटसमोर थांबत असतो हे आर्यन पाटील याला माहिती होते. त्याचा गेम करायचा तर तेथेच करायचा असा त्याने प्लॅन केला. त्याने आपला मित्र आदित्य प्रमोद वालकर याला ही या कामासाठी तयार केले. दोघांनी ही घटनेच्या आधी दोन तीन दिवस कॉलेज परिसरात टेहाळणी केली.विष्णुला मारताना रोडवर वर्दळ ही असणारच हे त्यांना ही माहिती होते. तरी ही त्यांनी धाडस करायचे ठरविले. लॉ.कॉलेजच्या प्रवेशद्वारा समोरील रॉयल टॉवर समोर मजुन असणाऱ्या तरूणाचा घोळका होत होता. तेथे अशा मजनुचा अड्डाच बनला होता. तेथे विष्णु वडर ही शायनिंग मारत उभा आहे. ही गोष्ट आर्यन पाटील आणि आदित्य वालकर यांनी पाहिले. गुरूवार दि.१ जानेवारी २०२६ रोजी कॉलेज हे दुपारच्या सुमारास सुटले. दुपारी दोनच्या सुमारास विष्णु हा आपल्या मित्रासोबत कॉलेजच्या गेटसमोर शायनिंग मारत थांबला होता. थोडया वेळाने कॉलेजमधील मुलीची ये जा कमी झाल्यानंतर विष्णुचे मित्र तेथून निघुन गेले. रॉयल टॉवर समोरील रस्त्यावरील गर्दी थोडी कमी झाली. त्यावेळी दुपारचे २ वाजले होते. त्याच वेळी तेथे एका बाईकवरून आर्यन पाटील हा आदित्य वालकर याच्यासोबत आला. विष्णुकडे रागाने बघत साल्या माझी गेम करणार काय म्हणत त्याने आपल्याकडील चाकू काढला आणि विष्णुच्या डोक्यात, पाठीवर आणि पोटावर चाकूने सपासप वार केले.त्या वारात रक्ताच्या थारोळयात विष्णु वडर हा रस्त्यावरच पडला. कोणाला काही समजण्याच्या आतच त्या दोघांनी विष्णुला संपवून तेथुन आपल्या बाईकवरून पलयान केले. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडली. काहीनी आपआपल्या दुकानाची शटर लावून घेतले. तर काही जण खून झाला म्हणून ओरडत पळू लागले. रक्ताच्या थारोळयात पडलेल्या विष्णुला काहीनी उपचारासाठी वसंतदादा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्याला अति दक्षता विभागात दाखल करून घेतले. परंतु तेथील उपचारापुर्वीच अति रक्तस्त्रवाने त्याचा मृत्यु झाला. कुणी तरी या घटनेची माहिती विश्रामबाग पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा सुरू करून या घटनेची माहिती घेतली.पोलीसांनी या घटनेची माहिती वडर गल्लीत राहणाऱ्या विष्णु वडर याच्या आई वडिलांना आणि नातेवाईकांना दिली. या घटनेची माहिती मिळताच त्याचे आई वडिल आणि नातेवाईकांनी सरकारी दवाखान्यात गर्दी केली. घटनास्थळी उपाधिक्षक संदिप भागवत, विश्रामबाग पोलीस स्टेशनेच पो.निरी. सुधीर भालेराव, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.निरी. संजीवकुमार झाडे. स.पो.नि. चेतन माने सह आदिनी भेट दिली. घटनास्थळी पोलीसांनी फॉरेनिक्स लॅब आणि डॉग स्काडला ही पाचारण केले. ही घटना लॉ कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोर घडली असल्याने तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली होती. पोलीसांनी या सीसीटीव्हीचे फुटेज तपासले. त्यात एका बाईकवरून दोघेजण येवून विष्णु वडर याच्यावर चाकूने वार करीत असल्याचे दिसत होते. तसेच या बाईकवरून पळून जात असताना या बाईकचा नंबर पोलीसांना दिसत होता. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीसांनी शोध घेतला असता या घटनेनंतर अवघ्या दोन तासातच कुपवाड येथील रत्नदीप हौसिंग सोसायटीतून आर्यन पाटील याला ताब्यात घेतले. त्याला विश्रामबाग पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना देवून या गुन्हयातील आपल्या मित्राचे नाव ही पोलिसांना सांगितले. त्याने दिलेल्या माहितीवरून विश्रामबाग पोलीसांनी या गुन्हयातील त्याचा दुसरा साथीदार आदित्य वालकर याला कुपवाड येथील राणा प्रताप चौकातून तो राहत असलेल्या घरातून ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. दोघांनी ही आपला गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत विष्णु वडर याचे वडिल सतीश वडर याच्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी विष्णु सतिश वडर (२३) रा.वडर गल्ली, सांगली याच्या खून प्रकरणी आर्यन हेमंत पाटील (२३) रा.रत्नदीप हौसिंग सोसायटी, कुपवाड आणि आदित्य प्रमोद वालकर (२१) रा.राणा प्रताप चौक कुपवाड याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. विश्रामबाग पोलीसांनी दोघांना ही सांगली येथील प्रथमवर्ग कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने या दोघांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकु आणि दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास स.पो.नि. चेतन माने हे करीत आहेत.

क्राईम संध्या सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६ ते रविवार दि. ११ जानेवारी २०२६ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com



# पाथरीत अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्याचे नियोजन मात्र रात्रीची लाट थांबत नाही; पथकाच्या आड वसुलीचा संशय

## दोन महिन्यात केवळ तीन वाहनांवर कारवाई



**पाथरी : वार्ताहर**

पाथरी तालुक्यात अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी तहसीलदार शंकर हंदेश्वर यांनी विशेष पथके नेमली असली तरी रात्री दहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत सोनपेठ-पाथरी रोड, पाथरी-तुरा रोड, पाथरी-हदगाव रोड आणि पाथरी-रेणापूर रोड या मार्गावर हायवा, टिप्पर बिनबोभाट धावत असल्याने प्रशासनाची कारवाई संशयास्पद ठरली आहे. मागील दोन महिन्यांत फक्त दोन ट्रॅक्टर व एका टिप्परवर कारवाई करण्यात आली असून, पथकाच्या आड अवैध वसुली चालू असल्याचे लांडगे ढोंग, कारवाई सोंग अशी म्हण लोकप्रिय झाली आहे.

पाथरी तालुक्यातील नदीनाल्यांमधून अवैध वाळूची वाहतूक हा कायमचा प्रश्न आहे. तहसीलदार शंकर हंदेश्वर यांनी या समस्येला आळा घालण्यासाठी दररोज वेगवेगळी पथके तयार केली. त्यांनी स्पष्ट आदेश काढले की, अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करावी व वाहने जप्त करावीत. या आदेशानुसार महसूल कर्मचारी, पोलिस व स्थानिक पंच यांच्यासह पथके रस्त्यांवर फिरू लागली. मात्र, दिवसा शांत असलेल्या या रस्त्यांवर रात्री वाळू भरलेले हायवा व टिप्पर सुसाट धावतात,तरी पथकांना एकही वाहन सापडत नाही. हे गोड बंगाल समजायला नागरिकांना जड जात आहे. नागरिकांमध्ये आता जोरदार चर्चा आहे की, पथकांचा वापर फक्त दिखावा म्हणून होत असून, त्यांच्या आड वाळू माफियांकडून वसुली सुरू आहे. रात्रभर चालणारी अवैध वाळू वाहतूक सुरू असताना दोन महिन्यांत फक्त तीन वाहनांवर कारवाई? ही कारवाई संशयास्पद आहे, असे स्थानिक शेतकरी व व्यापारी सांगत आहेत. सोनपेठ-पाथरी रोडवर रात्रभर सुमारे १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत टीप्पर चालु असतात परंतु पथक कुठे असतात ? पाथरी-तुरा रोडवर टिप्परची वर्दळ असते, तरी कारवाई नाही. हदगाव व रेणापूर रस्त्यांवरही असेच चित्र आहे. या मार्गावरून वाळू पाथरी शहरासह ग्रामीण भागात त्यांचं बरोबर मानवत नेली जाते, ज्यामुळे स्थानिक नद्यांचे नुकसान होत आहे. या प्रकरणाने तालुक्यातील सामान्य माणसांचा संताप वाढला आहे. तहसीलदारांचे पथक रस्त्यावर फिरते, पण रात्रीची वाहतूक थांबत नाही. नक्कीच वसुली चालू असेल, अशी चर्चा बाजारपेठेतून ते गावपट्ट्यात रंगली आहे. मागील दोन महिन्यांत केवळ दोन ट्रॅक्टर व एक टिप्पर जप्त करण्यात आले, तर रात्री बरेच वाहने धावतात. ही विसंगती प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. महाराष्ट्रभर अवैध वाळूचा प्रश्न गंभीर आहे. नांदेडमधील दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रमाणे, जालन्यात तहसीलदारांच्या ड्रायव्हरची लाचखोरी किंवा सोलापूरसारख्या ठिकाणी कोट्यवधी दंड अशा घटना घडल्या आहेत. पाथरीतही तशीच परिस्थिती असल्याचे दिसते. तहसीलदार हंदेश्वर यांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे व रात्रीच्या पथकांना सक्रिय करावेत, अशी मागणी होत आहे. अन्यथा, वाळू माफियांचे मनोबल वाढेल व स्थानिकांचा विश्वास उडून जाईल. नागरिक आता उच्च अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचे बोलले जात आहे. पाथरी तालुक्यात अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी खरी कारवाई होईल का हे पाहावे लागेल

**पोलिसांकडूनही महिनाभरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर एकही कारवाई नाही**

पाथरी तालुक्यात रात्रीच्या काळोखात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर आणि हायवा वाहनांचा धुमाकूळ सुरू आहे. सोनपेठ-पाथरी रोड, तुरा-पाथरी रोड आणि पाथरी-हातगाव रोडवर बिनबोभाट ही वाहने धावत आहेत, मात्र गेल्या एका महिन्यात पाथरी पोलिसांनी एकाही वाहनावर कारवाई केली नाही. या प्रकरणामागील नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित होत असून, स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनावर उदासीनतेचा आरोप केला आहे. पाथरी तालुका परभणी जिल्ह्यातील एक महत्त्वाचा भाग असून, येथील प्रमुख रस्त्यांवर रात्री १० वाजता नंतर अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने सर्रास फिरताना दिसतात. सोनपेठ-पाथरी रोडवरून गोदावरी नदीच्या पात्रातून चोरट्या पद्धतीने उत्खनन केलेली वाळू लपवून वाहली जाते. तुरा-पाथरी रोड आणि पाथरी-हातगाव रोडवरही असेच टिप्पर आणि हायवा वाहनांचे फेरवे सुरू आहेत. ही वाहने विना नंबर किंवा बनावट नंबर लावून चालवली जातात, ज्यामुळे ओळखणे कठीण होते. स्थानिक रहिवाशांनी सांगितले, रात्रीच्या वेळी धडधडाट होत असते, पण पाथरी पोलिस कुठेही दिसत नाहीत. हे वाळू माफिया बिनधास्त धंदा चालवत आहेत. गेल्या एका महिन्यात पाथरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशा वाहनांची संख्या बरीच असावी, तरी एकही कारवाई झालेली नाही. याउलट, परभणी जिल्ह्यातील इतर भागांत मात्र कारवाया होत आहेत. उदाहरणार्थ, एप्रिल महिन्यात पाथरी पोलिसांनी पहाटे चार वाजता दोन टिप्पर जप्त केले होते. त्या वेळी चालक आणि मालकांवर गुन्हे दाखल झाले, पण त्यानंतर मात्र पूर्ण शांतता. पाथरीत गोदावरी नदीकाठावर मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन होत असल्याचेही समोर आले आहे. येथे शेतकऱ्यांच्या शेतातील पाईप फोडणाऱ्या वाहनांवर स्थानिकांनी दगडफेक केली होती, ज्यामुळे वाळू माफिया आणि गावकऱ्यांमध्ये संघर्ष झाला होता.

राज्य सरकार स्तरावर अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी कडक पावले उचलली जात आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी परिपत्रक जारी करून पहिल्यांदा पकडल्यास ३० दिवस परमिट बंदी, दुसऱ्यांदा ६० दिवस आणि तिसऱ्यांदा कायमस्वरूपी रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस आणि महसूल विभाग संयुक्त कारवाई करणार असल्याचे जाहीर झाले आहे. जाफराबादसारख्या ठिकाणी महसूल पथकाने विना नंबरचे टिप्पर आणि हायवा जप्त केले, तर सिंधुदुर्गात डंपर मालकाला १ लाख ६३ हजारांचा दंड ठोठावला गेला. मात्र पाथरीत पाथरी पोलिसांकडून कारवाईचा पूर्ण अभाव असल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. रात्रीच्या गश्ती का होत नाहीत का? होत असतील तर मग कारवाई का नाही? यामागे राजकीय दबाव आहे का की मानवी संसाधनाची कमतरता, हे शोधणे गरजेचे आहे, असे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सांगतात. अवैध वाळू वाहतूकमुळे सरकारचा महसूल लाखो मध्ये तोटा होतो,नद्यांचे पर्यावरण नुकसान होते आणि कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. नागरिकांनीही जबाबदारी घ्यावी, अशी सूचना सरकारने केली आहे. अवैध वाहतूक दिसल्यास तात्काळ परिवहन विभाग किंवा पोलिसांना माहिती द्यावी. पाथरी तालुक्यातील हे वाळू माफियाचा खेळ आटोक्यात येण्यासाठी पाथरी पोलिस कारवाई आवश्यक आहे. प्रशासनाने तातडीने भरारी गश्त वाढवाव्यात, अन्यथा स्थानिकांचा रोष वाढेल, असा इशारा देण्यात आला आहे. ही बाब तपासली तरच अवैध वाळू वाहतूकवर खरंच नियंत्रण येईल.

**भिवंडीत भाजपाने खाते उघडले!**

# माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पाटील बिनविरोध विजयी!




**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने विजयाचे खाते उघडले आहे. प्रभाग समिती क्रमांक १७ ब मधील भाजपा उमेदवार माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत. आपल्या निवासस्थानी विजय जल्लोष साजरा करीत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन करून सुमित पाटील व माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे अभिनंदन करीत हा विजय भिवंडीतील विजयाची नांदी ठरेल अशा शुभेच्छा दिल्या आहेत. विशेष म्हणजे २४ वर्षांच्या पालिका इतिहासात झालेल्या चार निवडणुकीत कोणीही बिनविरोध विजयी झाला नव्हता तो विक्रम भाजपाचे सुमित पाटील यांनी पाचव्या सार्वत्रिक निवडणुकीत केला आहे. देशाचे नेतृत्व करणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वा खाली राष्ट्र आणि राज्यात सुरू असलेला विकासाचा रथ कोणी रोखू शकत नाही. या विश्वासाने जनता भाजपा कडे बघत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ ब मधील प्रतिस्पर्धी उमेदवारांना परिसरासह शहराचा विकास भाजपच्या नेतृत्वाखाली होऊ शकतो हा विश्वास असल्याने त्यांनी मोठ्या मनाने उमेदवारी मागे घेत सुमित पाटील यांना नेतृत्व करण्याची संधी दिली आहे अशी प्रतिक्रिया माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली आहे. हा विजय भिवंडीत महायुतीच्या माध्यमातून विजयरथ सुरू ठेवणारा असून पालिकेवर महायुतीची सत्ता आणून महापौर महायुतीचाच बसेल असा विश्वास कपिल पाटील यांनी शेवटी व्यक्त केला आहे. मी मागील पाच वर्षात पद्मानगर भागात केलेल्या कामाला जनतेने पसंती दिल्याने व या विभागाचा विकास अधिक जोमाने भाजपाच करू शकतो हा विश्वास व्यक्त केल्या बद्दल समस्त नागरिकांचा मी आभारी आहे अशी प्रतिक्रिया सुमित पाटील यांनी दिली आहे.

**प्रशासन आणि स्पर्श फाउंडेशनचा समन्वय**

# स्थलांतरित व वंचित मुलांना शाळेत दाखल केले



**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील स्थलांतरित मजूर कुटुंबे आणि वंचित घटकांतील २३ शाळाबाह्य मुलांना शाळेत अधिकृत प्रवेश मिळाला असून जिल्हा परिषद आणि स्पर्श फाउंडेशनच्या समन्वयाने राबविलेल्या विशेष मोहिमेचा हा परिणाम आहे. या मुलांना शालेय गणवेश वितरित करण्यात आले असून, पाठ्यपुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य लवकरच पुरवले जाईल. स्पर्श फाउंडेशनने रजई वाटप उपक्रम राबविताना पालघर येथील आरोग्यम रुग्णालय परिसरात शाळेबाह्य मुले निदर्शनास आली. या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फाउंडेशनने २९ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांच्याशी संपर्क साधला. जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांना यात लक्ष घालण्यास सांगितले. दरम्यान स्पर्श फाउंडेशनने प्रत्यक्ष सर्वेक्षण करून ३ डिसेंबर रोजी २३ मुलांची यादी सादर करून ही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांना दिली गेली. त्या अनुषंगाने २८ डिसेंबर सायंकाळी ५.३० वाजता मनोज रानडे यांनी स्वतः शिक्षण अधिकारी सोनाली मातेकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) व्यंकटराव हुंडेकर, फाउंडेशनच्या अध्यक्ष रुतू संखे यांचे सह भेट दिली. यावेळी मुलांची वास्तव्यस्थिती आणि शालेय प्रवेशाची गरज तपासण्यात आली. पालक व मुलांना शाळेत प्रवेश घेण्याबाबत आवाहन करण्यात आले. त्याप्रमाणे २९ डिसेंबर २०२५ रोजी १२ मुले नाना नानी पार्क जवळील अंगणवाडी व १४ मुलांची जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ मध्ये मुलांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, ही आमची जबाबदारी आहे. अशा मोहिमांना पुढील काळात वेग देण्यात येईल, असे रानडे यांनी यावेळी सांगितले.

# भिवंडीत 'आम्ही भिवंडीकर' महोत्सवाचे आयोजन



**भिवंडी : वार्ताहर**

महिलांच्या सप्तगुणांना वाव मिळावी या हेतूने जागर स्त्री शक्तीचा या संकल्पनेतून राहनाळ ग्रामपंचायतीचे सरपंच प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राहनाळ मधील माऊली ग्रामसंस्था या महिलांच्या बचत गटाच्या पुढाकाराने शहरातील अंजूर फाटा परिसरातील अनमोल मार्केट जवळील चरणी पाडा मैदानात 'आम्ही भिवंडीकर' महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सदर महोत्सव ४ जानेवारी ते १८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते ११ पर्यंतच्या वेळेत सुरू राहणार आहे. तर या महोत्सवाचे उद्घाटन रविवारी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते केले जाणार आहे. दरम्यान महोत्सवा वेळी सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी स्पर्धा व खेळांचे आयोजन केले आहे.

दरम्यान महिलांसाठी दररोज लकी ड्रॉ ठेवला जाणार असून बक्षिस म्हणून पैठणी आणि सोन्याची नथ दिली जाणार आहे.तसेच महोत्सवामध्ये बचत गटातील स्त्रियांना आणि निम्न आर्थिक स्तरातील घटकांना निशुल्क स्टॉल देण्यात येणार आहेत. यासह माऊली ग्रामसंस्था बचत गटाच्या महिलांनी तयार केलेले दागिने, साबण, मसाले व इतर विविध वस्तू याप्रसंगी विक्रीसाठी ठेवले जाणार असून तालुक्यातील महिलांनी या महोत्सवाला भेट देवून एक पाऊल आद्योगाच्या दिशेने टाकण्यासाठी चा हा प्रयत्न असल्याचे यावेळी आयोजक महिला बचत गटाने सांगितले. तसेच आगरी कोळी खाद्य संस्कृती टिकून राहावी याकरिता घरगुती तयार केलेल्या मसाल्यांचाच वापर करून मांसाहारी, शाकाहारी जेवण बनवले जाणार असल्याची माहितीही यावेळी महिलांनी दिली. त्यामुळे या आम्ही भिवंडीकर महोत्सवाला मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग दर्शवून कार्यक्रम यशस्वी करावे, असे आवाहन प्रताप पाटील यांच्यासह माऊली ग्रामसंस्था बचत गटाने तालुक्यातील महिला व त्यांच्या कुटुंबियांना केले आहे.

# वाडा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदा पदभार रीमा गंधे यांनी स्वीकारला



**वाडा : वार्ताहर**

वाडा नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष रीमा हर्षद गंधे यांनी गुरुवारी (दि.१जाने.) अधिकृतपणे नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने निवडणूक लढवून विजयी झालेल्या रिमा गंधे यांनी खासदार डॉ.हेमंत सवरा, जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, जिल्हा अध्यक्ष भरत राजपूत यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकाराला. नगरपंचायत कार्यालयात झालेल्या या पदभार स्वीकार समारंभात सर्व नगरसेवक, नगरपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर नगराध्यक्ष रीमा गंधे यांनी वाडा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण तसेच मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणावर विशेष लक्ष दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांनी नगराध्यक्ष रीमा गंधे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. वाडा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

# ठाणे जिल्हा मार्केटिंग फेडरेशनमार्फत शेतकऱ्यांना धान खरेदीची परवानगी द्यावी -खा.डॉ.हेमंत सवरा

**वाडा : वार्ताहर**



ठाणे जिल्ह्यालगत असलेल्या पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणी व धान खरेदीबाबत निर्माण झालेल्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे महत्त्वाची मागणी केली आहे. पंचायत समितीचे माजी उपसभापती व भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष मंगेश पाटील व त्यांचे इतर शेतकरी गेले अनेक दिवस सातत्याने या मागणीसाठी पाठवणा करत होते त्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील अनेक शेतकरी हे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यालगत वास्तव्यास असून, भिवंडी तालुक्यातील जिल्हा मार्केटिंग फेडरेशनची धान खरेदी केंद्रे त्यांच्या निवासस्थानाच्या अत्यंत जवळ आहेत. त्यामुळे मागील अनेक वर्षापासून हे शेतकरी ठाणे जिल्ह्यात ऑनलाईन नोंदणी करून तेथेच शासकीय दराने धान विक्री करत होते. मात्र, चालू वर्षात जिल्ह्याबाहेरील म्हणजेच पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी ठाणे जिल्ह्यात होत नसल्यामुळे या शेतकऱ्यांना आपले धान अत्यल्प दराने खाजगी व्यापाऱ्यांना विकण्याची वेळ आली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे डॉ. सवरा यांनी नमूद केले आहे.

याशिवाय, ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यालगत असलेल्या पालघर जिल्ह्यातील सुमारे ९० टक्के शेतकरी हे बिगर आदिवासी आहेत. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा स्वतंत्र जिल्हा निर्माण झाल्यानंतरही अनेक शेतकऱ्यांच्या आधारकार्डवर आजही जिल्हा ठाणे अशी नोंद आहे. तसेच अनेक शासकीय कार्यालये आणि ठाणे-पालघर जिल्ह्याचे टी.डी.सी. बॅंक मुख्यालय आजही ठाणे येथेच कार्यरत असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, पालघर जिल्ह्यातील ठाणे जिल्ह्यालगत असलेल्या शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व धान खरेदी ही जिल्हा मार्केटिंग फेडरेशन, ठाणे यांच्यामार्फत करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी डॉ. हेमंत सवरा यांनी केली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टळून त्यांना शासकीय हमीभावाचा लाभ मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. सदर विषयाची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती डॉ. सवरा यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी



**वाडा : वार्ताहर**

वाडा शहरातील खंडेश्वरी नाका येथील स्त्रीस्वप्न कल्याणकारी संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रा.जयश्री कवटेकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित मुली व महिलांना मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे कार्य केले, तर राजमाता जिजाऊ यांनी संस्कार, धैर्य आणि नेतृत्वाची शिकवण दिली, असे सांगितले. आजच्या काळात सावित्रीबाई फुले व जिजाऊ यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजातील महिला सक्षम व्हाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच दोन्ही थोर व्यक्तिमत्त्वांना अभिवादन करण्यात आले. स्त्रीस्वप्न कल्याणकारी संस्थेच्या संचालिका प्रणाली पाटील व पदाधिकाऱ्यांसह नागरिक उपस्थित होते.

# निवडणुकीचा चोरबाजार!

मतदार याद्यांमध्ये घोटाळे असल्याने त्या याद्या दुरुस्त केल्यानंतरच निवडणुका घ्या. अशी विरोधकांची मागणी असतानाही, निवडणूक आयोगाने काहीशा जबरदस्तीने आणि सरकारच्या प्रभावाखाली येऊन निवडणुका घेतल्या. खरे तर ही लोकशाहीची क्रूर थट्टाआहे.पण आपल्या देशात लोकशाही उरली कुठे? त्यामुळे सामान्य माणसाची वाटचाल गुलामीतून गुलामिकडे सुरू आहे. निवडणुका केवळ नावाला होत आहेत. पण जिथे निवडणूक आयोगाची विश्वासार्हता संपलीय तिथे निवडणुकांवर कसा विश्वास ठेवायचा नगरपरिषदा आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीनंतर येत्या १५ जानेवारीला २९ महानगर पालिकांच्या निवडणुका होत आहेत. पण या निवडणुकीत तिकीट वाटपापासून बंडखोरी पर्यंत जो तमाशा सुरू झालाय तो संतापजनक आहे.सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाली आहे. तिकीट वाटपानंतरची राडेबाजी तिकीट नाकारलेल्या रडारड आणि त्यानंतर पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरुद्ध केलेली बंडखोरी या सगळ्यामुळे पक्षनेतृत्वाची मात्र हलत खराब झाली आहे. बंडखोरांची मनधरणी करताना नेत्यांच्या नाकी दम येतोय अर्थात या सगळ्याला कारणीभूत जर कोण असेल तर पक्षावर विश्वास टाकून आयुष्यभर पक्षाचे झेंडे नाचवणारे मूर्ख व तितकेच अंधभक्त कार्यकर्ते. कार्यकर्त्यांनी पक्षासाठी घरदार सोडून दिवस रात्र पक्षाचे काम करायचे आणि निवडणूक आली की पक्ष नेतृत्वाने निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून बाहेरून आलेल्या भ्रष्टाचारी किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना तिकीट द्यायचे काय तर म्हणे ते निवडून येण्यासाठी खर्च करू शकतात किंवा त्यांची त्यांच्या विभागात ताकत म्हणण्यापेक्षा दहशत आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण करणारे राजकीय पक्ष त्यांच्या सोबत डोळे झाकून सर्व अन्याय सहन करून काम करणारे अंधभक्त गरीब कार्यकर्ते यांना पक्षाने तिकीट नाकारून एक प्रकारे शिक्षा दिली आहे. त्याच्याही पुढे जाऊन सांगायचे झाल्यास त्यांना त्यांची लायकी दाखवून दिली आहे. त्यामुळे कार्यकर्ता हा पक्षातील नेत्यांचा गुलाम बनला आहे. आणि गुलामन मन किंवा भावना नसाव्यात त्यांनी मालक पाठीवर जी ओझी लादेल ती निमूटपणे वाहवीत. या निवडणुकीत सत्ताधारी पक्षातील अनेकांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना तिकीट दिलीत. यात अजित पवरांची राष्ट्रवादी सर्वात आघाडीवर आहे. खून प्रकरणार अटकेत असलेल्या आंदेकरांच्या घरातील दोन महिलाना तिकिटे देऊन राष्ट्रवादीने ते सिद्ध करून दाखवले पुण्यातील कुख्यात गुंड आणि मोक्याचा आरोपी बापू नायर राष्ट्रवादीचा उमेदवार बनलाय. कुख्यात बंडू आंदेकरची वाहिनी आणि सून राष्ट्रवादीची उमेदवार बनलीय. कुख्यात माफिया गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे राष्ट्रवादीची उमेदवार बनलीय तर टोळीयुधात मारल्या गेलेल्या शरद मोहोळ यांच्या पत्नीलाही उमेदवारी मिळाली आहे हे सर्व पाहता लोकांनी अशा पक्षाच्या मागे का भरकटत जावे? त्यांच्या उमेदवारांना का मतदान करावे? अर्थात ज्यांचे नेतेच भ्रष्टाचारी आहेत. सरकारी पैसे लुटून पचणारे आहेत त्या पक्षाकडून काय अपेक्षा ठेवाव्यात? पण अशा प्रकारचे पक्ष आणि अशा पक्षांचे उमेदवार जर निवडणुकीच्या रिंगणात असतील तर लोकांनी लोकानी निवडणुकीत का भाग घ्यायचा मतदानासाठी तासनतास का रांगेत उभे रहावे? वाईट वाटते ते आता तिकीट न मिळालेल्या निष्ठावान कार्यकर्त्यांचे हजार पाचशे रुपयांसाठी भ्रष्ट नेत्यांच्या मागे फिरून त्यांना मोठे करायचे आणि निवडणुकीत त्यांना तिकीट नाकारल्यावर रडारड करायची नेत्यांना शिवीगाळ करायची त्यांची कार्यालये फोडायची अरे पण स्वतःला निष्ठावान समजणाऱ्या हरामखोरांनो तुम्हीच या नेत्यांना मोठे केलेत ना! मग आता कशाला रडतं बसता? उचला सतरंजा नाचा पक्षाचे झेंडे आणि आयुष्यभर करा आपल्या भ्रष्ट आणि गुन्हेगार नेत्यांचे समर्थन! पुढच्या निवडणुकीत सुधा तुमची हीच अवस्था होणार आहे. कारण राजकारणात निष्ठेला कवडीची किंमत राहिलेली नाही. निष्ठेची विष्ठा झालीय. तेंव्हा रडू नका, आदळ आपट करू नका बहरून आलेल्या पैसेवाल्यां बरोबर जुळवून घ्या मग तो चोर असो भ्रष्टाचारी असो की बलात्कारी असो त्याची चाकरी करण्याची त्याचे जोडे वाहण्याची तयारी ठेवा तुमचे भले होईल कारण पूर्वी तुमचा नेता तुम्हाला फक्त हजार पाचशे द्यायचा पण आता बाहेरून आलेल्या लोकांकडे खूप पैसे आहेत त्यांचे नेतृत्व मान्य करा आणि त्यांच्याकडून पैसे कमवा हेच निष्ठावंतांच्या नशिबी आहे राहता राहिला सवाल मतदारांचा! तर आजचा मतदार सिडनी आहे. सध्या राजकारणात जे किळसवाणे प्रकार सुरू आहेत ते त्याला दिसतात. पण दुर्दैवाने त्याच्याकडे आज पर्याय नाही. कारण सगळेच लबाड आहेत. अशावेळी दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने त्यातल्या त्यात एखादा कुणी चांगला उमेदवार असेल तर त्याचा पक्ष न पाहता लोक त्याला मतदान करतात.पण नंतर त्यालाही राजकारणाची बाधा होते आणि तोही प्रचलित राजकारण्यांसारखा बनतो. हे दुष्टचक्र कुठेतरी थांबले तरच या देशातील लोकशाही टिकून राहील.अन्यथा जनतेला राजकारणांच्या समोर मान वर करण्याची हिंमत राहणार नाही. एक लोकप्रतिनिधी जेव्हा निवडून गेल्यावर दुसऱ्या पक्षात जातो तेव्हा त्याला निवडून देणाऱ्या मतदाराला किती यातना होत असतील याचा विचार आता तरी लोकांनी करायला हवा आणि अशा दलबदलूला पुढील निवडणुकीत पडायला हवे. जेणेकरून राजकीय पक्षांना लोकांच्या मनातील संताप आणि नंतर त्यातून होणारा उद्रेक कळेल. मुंबई पुरते बोलायचे झाल्यास यावेळी युती आणि आघाडी दोन्ही फुटल्यात प्रत्येकजण स्वबळावर नशीब आजमावण्याचा प्रयत्न करतोय पण ते वाटते तितके सोपे नाही. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नागरी सुविधांच्या प्रश्नांवर लढवल्या जातात अशावेळी ज्या पक्षांनी लोकांचे नागरी सुविधांचे प्रश्न सोडवले त्याच लोकांना जनतेची साथ मिळते. त्यातच अपक्षांचे धंदे लोकांना कळलेले निवडणुकीत निवडून यायचे आणि नंतर पैसे किंवा सत्तेतील मोठे पद घेऊन कुणाच्याही मागे जायचे हेच अपक्षांचे धोरण असते आणि ते लोकांना कळलेले आहे. त्यामुळे अपक्षांसाठी ही निवडणूक सोपी नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शंभरहून अधिक लोक बिनविरोध निवडून आले. आता न्यायालयाने चौकशीचे आदेश दिलेत.कारण बिनविरोध निवड संशयास्पद असते. दिवंगत बाबा आमटे, बाबा आढाव, अण्णा हजारे, दिवंगत सिंधुताई सपकाळ यांच्यासारखी खरखुरी समाजसेवक मंडळी बिनविरोध निवडून आली तर ते समजू शकते. पण जण समाजात कवडीचीही किंमत नाही. ज्यांनी समाजासाठी काही केलेले नाही. असे लोक जेव्हा बिनविरोध निवडून येतात. तेंव्हा त्यांची चौकशी व्हायलाच हवी. सध्याच्या गलिच्छ राजकारणात एखाद्याची बिनविरोध निवड होणे हे संशयास्पद आणि लोकशाहीसाठी घटक आहे. कारण काही ठिकाणी जे धनदांडगे असतात ते पैशाच्या किंवा दहशतीच्या जोरावर प्रतिस्पर्धी उमेदवाराला माघार घ्यायला लावतात यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बऱ्याच ठिकाणी अशा घटना घडल्या आहेत त्यामुळे जेजे बिनविरोध निवडून आलेत त्यांची आणि तिथल्या निवडणूक अधिकाऱ्यांची चौकशी व्हायला हवी.

# सावित्रीबाई फुले या देशाच्या पहिल्या स्त्री शिक्षिका मुख्याध्यापिका!

इंग्रजी माऊली, इंग्रजी सावली! इंग्रजी वैखरी; बहुजनांची! इंग्रजी शिकुनी; जातीभेद मोडा! फेकूनिया; भट भारुडा! असा असा क्रांतिकारी संदेश देणाऱ्या क्रांती माता सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ मध्ये सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे नेवासे पाटलांच्या कुळात झाला व अवघ्या नव्या वर्षीच त्यांचा विवाह युगप्रवर्तक क्रांतीसुर्य ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. सन १८४० पासून त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला अज्ञान अंधारस्वनाश संपवण्यासाठीच ज्योतिराव फुले यांनी जे महायुद्ध पुकारले त्यात सावित्रीबाई फुलेनेउडी घेतली आपल्या संसाराचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी चंदनाप्रमाणे झिजली म्हणून म्हणावेसे वाटते जिवंत सारे जगतात त्यात थोडा सुगंध वाहू दे जे चंदनाप्रमाणे दिसतात त्यांचे जीवन किर्तीमान होऊ दे अशा कीर्तीमान दाम्पत्यानीसांगितले विद्याविना मती गेली; मतीविना नीती गेली; नितीविना गतीगेली वित्त विनाशूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्यने केले या देशात सर्व अनर्थ एका अविद्येने केले आहे हे कटू सत्य ज्योतिराव फुले यांनी




ओळखून १८४८मध्ये पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात मुलीसाठी पहिली शाळा काढली व सावित्री बाई या देशाची पहिली स्त्री शिक्षिका व मुख्याध्यापका झाली मनोवादाने बरबटलेल्या नराधमाने सावित्रीच्या अंगावर शेण विस्टा टाकून त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न केला पण सावित्री ने हा तर माझ्या कार्याबद्दल केला जात असलेला फुलांचा वर्षाव आहे असे सांगून समतेचा ज्वालामुखी आपल्या हृदयात धगधगता ठेवला ज्योतिरावांनी ०१ मे ८४९ रोजी पुणे येथे प्रौढांच्या शाळेची स्थापना केली तेथेही सावित्रीने अध्यापनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी निभावली पुढे पुणे सातारा नगर जिल्ह्यात ति समाजासाठी स्थापन केलेल्या काही शाळांमधून सावित्रीने शिक्षिकेची भूमिका पार पाडून आपले कर्तव्य पूर्ण केले १८५२ मध्ये जेव्हा शाळांची तपासणी झाली तेव्हा सावित्रीबाई नी आदर्श शिक्षका म्हणून अभिप्राय मिळवला. म्हणून १२ जानेवारी १८५३ रोजी मेजर कॅन्डी यांच्या हस्ते फुले दांपत्याचा विश्रामबाग वाड्यात गौरव करण्यात आला या प्रेरणे नंतर सावित्रीबाई व ज्योतिराव पेटून उठले ही घटना मात्र पुण्यातील कर्मठ लोकांसाठी वेदनादायी ठरली आणि त्यांनी ज्योतिराव फुले यांना ठार करण्याचा घाट घातला त्यासाठी त्यांनी रोडे रामोशी व धोंडीबा कुंभार यांची नियुक्ती केली पण त्यांचा तोही बेत फसला त्यानंतर मात्र रोड या रामोशी व धोंडीबा कुंभार हे सावित्रीबाई फुले यांचे अंगरक्षक बनले ते सावित्रीबाईला शाळेपर्यंत घेऊन सोडत व पुन्हा सावित्रीबाईला घरी आणून सोडत धोंडीबा कुंभाराने तर पुढे वेदाच्यार नावाचा ग्रंथ लिहून मोठा चमत्कार केला सन १८५२ मध्ये ज्योतिबांनी अनेक शाळा काढल्या त्यांच्या लग्नाला दहा-बारा वर्षाचा कालावधी उलटून गेला होता त्यांना मुल बाळ होत नसल्यामुळे नातेवाईक मित्र शेजारीपाजारी यांच्या चर्चा सुरू झाली नातेवाईकात एक विचार सुरू झाला की ज्योतिबाला दुसरी बायको करून द्यावी मग एक दिवस सावित्रीबाई ज्योतिरावांना म्हणाल्या स्वामी आपले लग्न होऊन आता दहा-बारा वर्षे झाली आपणाला काही आता मुलबाळ होत नाही तेव्हा ज्योतिराव सावित्रीला म्हणाले म्हणजे म्हणायचे काय तुला सावित्री म्हणते आपला वंश बुडून जाईल म्हणून तुम्ही एक काम करावे की तुम्हाला आता दुसरी पत्नी करून द्यावी असे मला वाटते तेव्हा ज्योतीराम म्हणतात सावित्री कदाचित तो दोष माझ्यामध्ये असेल तुझ्यात असेल असे कशावरून तर मग तुला जर दुसरा सावता करून दिला तर नाही का चालणार म्हणजे एवढी क्षमता एवढी मनाची व्यापकता फुलेकडे होती पुढे त्यानीकाशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले व शिकून डॉक्टर केले १ ८६८ मध्ये अस्पृश्य लोकांसाठी ज्योतिबा व सावित्री ने आपल्या घरचा पाण्याचा हौद खुला केला सावित्रीबाई हाडाच्या शिक्षिका होत्या समाजाच्या सुखदुःखाची त्यांना जाणीव होती सामाजिक जीवनात कार्य करताना त्यांना आढळून आले की या देशात तील शूद्र अति शूद्र समाज हा व्यसनाचा गुलाम आहे या व्यसनाच्या राक्षसी मगर मिठीतून हा समाज सोडविल्याशिवाय त्याचा विकास होऊ शकत नाही व्यसने कशी घातक आहेत हे सांगताना त्या म्हणतात व्यसनापासून माणसाची बुद्धी भ्रष्ट होते व माणुसकी नष्ट होते तेव्हा व्यसन हे मनुष्याची प्रतिष्ठा वाढवणारे नसून मनुष्यत्वास बाधा आणणारी खोड आहे या साठी विलंब न करता सत्वर सोडून द्यावी कोणत्याही व्यसनाने मनुष्याचा विचार पिंड धुंद होतो व्यसनाच्या कैफात तो आपले मनुष्यत्व विसरून जातो व कैफाच्या धुंदीत मी कोण माझी योग्यता काय हे त्याला समजत नाही दारूपायी उसळी गावच्या पाटलाची कशी वाईट अवस्था झाली हे त्यांनी या भाषणात सांगितले आणि श्रद्धेवर प्रहार करताना त्या म्हणतात धोंडी मुले देते! नवसा पावती; लग्न का करती! नारी नर! सावित्री वजते! करून या विचार जीवनसाकार! करूनी घ्या दगडाचे देव जर मुलांना जन्माला घालत असतील तर महिलांना पुरुषाशी लग्न करण्याची गरज काय असाच जळजळीत प्रश्न सावित्री या ठिकाणच्या व्यवस्थेला विचारते कर्ज घेऊन व्यर्थ उधळपट्टी करणे वैभवाचा आभास निर्माण करणे किती चुकीचे आहे हे त्यांनी कर्ज या विषयावरील भाषणातून स्पष्ट केले आहे. शेटजीचे कर्ज जो घे तयांची सुख दूर जाईल बेजार होईल कर्जदार!! कर्जाने लागत असे चिंता; घालवावीसारीमालमत्ता संसारात वाढावी गुंता आली अहंता ऋणकोची. शहाण्याने कर्ज काढू नये असे का म्हणतात ते त्यांनी सादर स्पष्ट केले आहे काही लोक कर्ज काढतात व आपल्या अंगाचे उद्योग चातुरे धाडस बुद्धी पराक्रम उत्साह हे षडगुण हरून बसतात सदा चरणावर बोलताना सावित्रीबाई म्हणतात सदाचरण हे मनुष्यास अधिक सुख प्राप्त करून घेण्याचे वृत्त आहे या वृत्तामुळे सर्व संसार दुःखाचा नाश होतो सावित्रीबाई ह्या बोलक्या नाही तर कर्त्या सुधारक होत्या त्या कठोर राष्ट्रभक्त होत्या, जेव्हा पुणे परिसरात १८७५ ते.१८७७ दरम्यान सतत दुष्काळ पडला होता शेकडो मुले अण्णावाचुन तडफडून मरू लागले तेव्हा ज्योतिरावाने ५२ अन्नछत्रे उघडून आंधळे पांगळे व लहान मुले यांना सतत जेवण दिले. धनकवडी येथे एक अन्नछत्र उभारले व त्याची सर्व जबाबदारी सावित्रीने स्वतःवर घेतली अनेकांना भूकबळी पासून वाचवले तिथे ती स्वतः भाकरी करून खाऊ घालत असे रोज दोन हजार भाकरी तयार करून वाढल्या जात यासाठी सावित्रीबाई कधी थकल्या नाहीत ज्योतिराव फुले १८८८ मध्ये पक्षघाताने आजारी पडले अर्धांग वायू झाला तरी या काळात त्यांनी सार्वजनिक सत्य धर्म नावाचे पुस्तक डाव्या हाताने लिहिले किती ओबीसी ने हे पुस्तक वाचले? ज्योतिरावांना वाटायचे बहुजन समाज शिकला तर काय वाचणार पोथ्या पुराणे जे त्यांच्या गुलामीसाठी लिहीत म्हणून ज्योतिराव व सावित्रीने साहित्य निर्माण केले २८ नोव्हेंबर १८९० ज्योतिरावर काळाने झडप घातली सावित्रीवर दुःखाचा डोंगर कोसळला सावित्रींना ज्योती रावांनाअग्नी कोणी द्यायचा हा वादसुरू झाला कारण ज्योतिरावांनीसावित्रीला सांगुन ठेवले होते ज्या लोकांनी मला विरोध केला त्यांना माझ्या देहाला हात सुद्धा लावू देऊ नको त्यावेळी ज्योतिरावांचे भाऊबंद वारसा हक्क सांगत बाबा फुले व महाद्वा फुले भांडण करू लागले तिर्डीला खांदा देण्यासाठी व अग्नी देण्यासाठी यशवंत हा आमच्या वंशाचा नाही असे म्हणू लागले व वाद निर्माण झाला तेव्हा सावित्रीने पोलिसांना बोलावून त्यांना हाकलून दिले व स्वतः सावित्रीने गाडगे हातात धरले व पतीच्या चितेला अग्नी दिला हे धर्मग्रंथाने निर्माण केलेल्या रुढीपरंपरेच्या गालावरचे चपराक जबरदस्त होती. सन १८९६ च्या दुष्काळातून लोक सावरत असतानाच सन १८९७ पुण्यात प्लेगाणे आहाकार माजवला अनेक लोक प्लेगाणे मृत्युमुखी पडत होते अशा परिस्थितीत सावित्रीबाईंनी डॉक्टर यशवंतला नोकरीवरून सुट्टी काढून बोलावून घेऊन उपचार कॅम्प सुरू केला त्या स्वतःही घराघरात झोपडी झोपडीतून लोकांना आधार देत होत्या रोग यांची सुश्रुषा करत होत्या अशातच मुंडावा गावच्या पांडुरंग बाबाजी गायकवाड याला प्लेगाची लागण झालेल्या मुलाला स्वतः पाठीवर उचलून दवाखान्यात घेऊन आल्या त्यातच त्यांनाही त्याचा संसर्ग होऊन प्ले गाची लागण झाली अशात १० मार्च १८९७ ला रात्री ९ वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची प्राणज्योत मालवली अशा महान क्रांतीकारक मातेस त्यांच्या जयंतीदिनी क्राईम संध्यापरिवारातर्फे कोटी कोटी प्रणाम.

**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे पालघर जिल्ह्यात शिक्षण परिवर्तनाची नवी पहाट!

## पालघर जिल्ह्यात शिक्षण परिवर्तनाची शिक्षण क्रांती; 'मॅथ्ससेतू'ने अध्यापनात घडवला बदल!

### एका सत्रातच २९% गुणांची झेप, शिक्षक-विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास द्विगुणीत

**पालघर : वार्ताहर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून राज्यात शैक्षणिक गुणवत्तेला नवे बळ मिळत असताना, पालघर जिल्ह्यात शालेय शिक्षण क्षेत्रात इतिहास घडवणारे परिवर्तन आकार घेत आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापन, सक्षम शिक्षक आणि डेटा-आधारित नियोजन या त्रिसूत्रीवर आधारित पालघर जिल्हा परिवर्तन प्रकल्प (शिक्षण) वेगाने पुढे जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सक्षम वर्गखोल्या, पायाभूत सुविधा, आत्मविश्वासपूर्ण शिक्षक निर्माण होत आहेत. अल्पावधीतच ठोस व मोजता येणारे सकारात्मक परिणाम समोर येणार आहेत. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशन आणि लीडरशिप फॉर इक्विटी (LFE) यांच्या सहकार्याने, जिल्हा परिषद व डाएट (DIET) पालघर यांच्या माध्यमातून राबविण्यात येणारा हा उपक्रम पालघरला राज्यातील शिक्षण परिवर्तनाचा आदर्श मॉडेल बनवत आहे. जिल्हा परिषद पालघर, डाएट पालघर यांच्या मध्ये झालेल्या जिल्हास्तरीय सामंजस्य करारामुळे (MoU) या प्रकल्पाला मजबूत संस्थात्मक पाया मिळाला आहे. शैक्षणिक नेतृत्व बळकट करणे, शिक्षकांची क्षमता वाढवणे, वर्गातील अध्यापन अधिक प्रभावी करणे आणि निर्णय प्रक्रियेत डेटाचा शास्त्रीय वापर करणे या उद्दिष्टांवर हा करार आधारित आहे.

या परिवर्तन प्रक्रियेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी सोनाली मानकर तसेच डाएट पालघरच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सातत्यपूर्ण पाठबळ लाभत आहे. डहाणू, तलासरी, वाडा, वसई आणि पालघर या पाच तालुक्यांतील २० शाळा भेटी आणि ७ प्रात्यक्षिक वर्गांमधून शिक्षकांची सज्जता, अध्यापनातील अडचणी व सुधारण्याच्या संधी स्पष्टपणे समोर आल्या. या थेट निरीक्षणांमुळे पुढील शैक्षणिक नियोजन अधिक अचूक व परिणामकारक झाले आहे.

**'मॅथ्ससेतू'ने तलासरीत निर्माण केला आत्मविश्वास**

तलासरी तालुक्यात सुरू करण्यात आलेल्या 'मॅथ्ससेतू' कार्यक्रमाने शिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी अधिकृत मंजुरीनंतर २८ नोव्हेंबर रोजी २० शिक्षकांसाठी पहिले प्रशिक्षण सत्र यशस्वीरीत्या पार पडले. शालेय शिक्षणात गुणवत्तेचा नवा मानदंड ठरवत 'मॅथ्ससेतू' सत्र-१ ने अल्पावधीतच ठोस आणि मोजता येणारे परिणाम दिले आहेत. केवळ एका सत्रात २९% गुणांची सरासरी सुधारणा नोंदवली गेली असून, पूर्व चाचणीत ३८ टक्के असलेली कामगिरी उत्तर चाचणीत थेट ६७ टक्क्यांवर पोहोचली आहे. या उपक्रमामुळे अध्यापन पद्धतीत बदल घडून येत असल्याचे स्पष्ट झाले असून, NLG 0.48 नोंदवला गेला आहे, जो मध्यम ते उच्च शिक्षण लाभ दर्शवतो. शिक्षक आणि प्रशिक्षणार्थींनी या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**उपयुक्तता आणि सहभागाला उच्च गुण**

'मॅथ्ससेतू' सत्राला उपयुक्तता ३.९/४ आणि सहभाग ४/४ असे उच्च गुण मिळाले असून, सत्रातील सहभाग पूर्णपणे सक्रिय व परिणामकारक राहिला आहे. प्रशिक्षणाच्या रचनेमुळे संकल्पनात्मक स्पष्टता, अध्यापनातील आत्मविश्वास आणि वर्गातील संवादात लक्षणीय सुधारणा दिसून आली. NPS ६८.८ समाधानाचा ठोस निर्देशांक असून प्रशिक्षणानंतर नोंदवलेला NPS (Net Promoter Score) ६८.८ हा शिक्षकांचा उच्च समाधान स्तर दर्शवतो. विशेष म्हणजे ६३ टक्के शिक्षकांमध्ये आत्मविश्वास व कार्यक्षमता वाढल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

**उत्तर चाचणीत २७५ टक्के झेप**

सर्वांत लक्षवेधी बाब म्हणजे, उत्तर चाचणीतील कामगिरीत २७५ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. ही वाढ केवळ गुणांची नसून, संकल्पनांची समज, अध्यापनातील सुसूत्रता आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या पद्धतीत झालेल्या बदलाची साक्ष देणारी आहे. शिक्षणात परिणामकारक धोरणाचे उत्तम उदाहरण आहे. 'मॅथ्ससेतू' उपक्रमाने सिद्ध केले आहे की, संरचित प्रशिक्षण, डेटा-आधारित मूल्यमापन आणि सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून अल्पकालावधीतही शिक्षण क्षेत्रात मोठा सकारात्मक बदल घडवता येतो. हा उपक्रम शिक्षक सक्षमीकरणाचा प्रभावी नमुना ठरत असून, भविष्यातील शैक्षणिक सुधारणांसाठी दिशादर्शक ठरणार आहे. मापन (लांबी, वजन, आकारमान, हालचाल) विषयांवरील प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे विषय प्रभुत्व आणि अध्यापन कौशल्ये अधिक प्रभावी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या यशाची दखल तलासरी तालुका प्रशासनाने अधिकृत सोशल मीडिया माध्यमातून घेतली, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

**१,६०० मास्टर ट्रेनर्समुळे जिल्हाभर शैक्षणिक साखळी मजबूत**

पालघर जिल्ह्यात १,६०० मास्टर ट्रेनर्स निश्चित करण्यात आले असून, हे प्रशिक्षक क्लस्टर आणि शाळा स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्याची मुख्य जबाबदारी पार पाडणार आहेत. याच अनुषंगाने २० नोव्हेंबर रोजी ३०० मास्टर ट्रेनर्ससाठी जिल्हास्तरीय शिक्षण परिषद, तर २४-२५ नोव्हेंबर रोजी अग्रिवाड्यासह विविध केंद्रांवर प्रशिक्षण सत्रे यशस्वीरीत्या पार पडली. 'निपुण भारत' अभियानाअंतर्गत ICDS, DIET आणि QUEST यांच्या सहभागाने झालेल्या जिल्हा समन्वय बैठकीत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानासाठी LFE च्या शैक्षणिक सहकार्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे बालवयातील शिक्षण अधिक भक्कम, शास्त्रीय आणि परिणामकारक होणार आहे. आगामी काळात मॅथ्ससेतूचा विस्तार वर्ग निरीक्षण व शिक्षक प्रशिक्षण, 'पूर्व व पश्चात' मूल्यमापन प्रणाली, जिल्हा डॅशबोर्ड व डेटा विश्लेषण, आणि मास्टर ट्रेनर टास्क-ग्रुपची औपचारिक रचना या बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी शैक्षणिक धोरणामुळे पालघर जिल्हा गुणवत्तापूर्ण अध्यापन, आत्मविश्वासपूर्ण शिक्षक आणि दीर्घकालीन शैक्षणिक क्षमता निर्माण करण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. पालघरचा हा शिक्षण परिवर्तनाचा प्रवास राज्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

05 TO 11 JANUARY 2026 - Page 5 (CRIME SANDHYA) NEW:Layout 1 1/3/2026 9:29 PM Page 1



# जैनच्या तंत्रज्ञानामुळे गुजरात, राजस्थानच्या वाळवंटी भागात शेतीत क्रांती

## जैन इरिगेशनच्या कृषी महोत्सवास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद



**जळगाव : वार्ताहर**

जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलालजी जैन यांच्या 'संजीवन दिन' जन्मदिनानिमित्त आयोजित 'सायन्स-टेकवर्क' कृषी महोत्सवाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत सुमारे ११ हजार शेतकऱ्यांनी या महोत्सवाला भेट देऊन जैन इरिगेशनच्या उच्च कृषितंत्रज्ञानाची अनुभूती घेतली. गुजरातमधील १०० हून अधिक डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांनीही या महोत्सवात आपला सहभाग नोंदविला. कंपनीचे (गुजरात) सहकारी योगेश पटेल व अॅग्रोनॉमिस्ट चेतन गुळवे यांनी देखील शेतकऱ्यांशी संवाद साधला. गुजरात आणि राजस्थानच्या वालुकामय प्रदेशात जिथे पूर्वी फक्त जिरे, इसबगोल व मोहरीचे उत्पादन घेतले जात असे, तेथे आज डाळिंबाचे भरघोस उत्पादन होत आहे. ही क्रांती जैन इरिगेशनच्या टिश्यू कल्चर व ठिबक सिंचनासारख्या उच्च कृषीतंत्रज्ञानामुळे शक्य होऊ शकली' असे वरिष्ठ कृषितज्ज्ञ डॉ.के.बी. पाटील यांनी जैन हिल्स येथील बडी हंडा सभागृहात डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधत या यशस्वी प्रयोगाबाबत सांगितले. २००४ मध्ये गुजरातच्या बनासकाठा जिल्ह्यातील डीसा येथे जैन इरिगेशनच्या टिश्युकल्चर डाळिंब लागवडीचा प्रथमच प्रयोग करण्यात आला. या प्रयोगाला मिळालेल्या यशामुळे सुरेंद्रनगर, हळवद, हिम्मतनगरसह अनेक भागात मोठ्या प्रमाणावर डाळिंबाची लागवड सुरू झाली. देशातील सर्वोत्तम गुणवत्तेच्या डाळिंबाचे अनेक पटींनी उत्पादन वाढले आहे. आज या भागातील डाळिंब निर्यातही होत आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्न एकरी ३०-४० हजार रुपयांवरून लाखो रुपयांचे डाळिंब येथे पिकतात त्यामुळे येथील भाग समृद्ध झालेला आहे. खरे तर महाराष्ट्रात डाळिंबाचे उत्पादन होत होते परंतु गुजरात व राजस्थानच्या शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने उत्पादनात त्यांनी आघाडी मिळविली आहे असेही डॉ. पाटील म्हणाले. राजस्थानातील झालावार, बाडमेर व जालोर जिल्ह्यातही डाळिंब शेतीने आर्थिक विकासाला नवे आयाम दिले आहे. वालुकामय भागातील पाण्याचा पीएच व इसी जास्त असूनही जैन इरिगेशनच्या तंत्रज्ञानामुळे डाळिंबासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. या प्रयोगांमुळे गुजरात व राजस्थानच्या वाळवंटी भागात शेतीत मोठी क्रांती घडली असून, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात जैन इरिगेशनचे योगदान अधोरेखित झाले आहे.

# सीए तेजश्री करंजुले पाटील यांनी स्वीकारला नगराध्यक्ष पदाचा पदभार



**अंबरनाथ : वार्ताहर**

नगरपरिषद निवडणुका नुकत्याच पारपडल्या, ह्या निवडूकांमध्ये बरेच बल्याड उमेदवार रींगनाथ उभे होते. सर्वस्व पणाला लावून जिंकूनयेण्यासाठी प्रयत्न करीत होते. पण मतदारचा कौल ज्या बाजूने वळले ते उमेदवार जिंकून आलेत. अंबरनाथ मध्ये तेजश्री विश्वजीत करंजुले- पाटील ह्या नगरपरिषद नगराध्यक्षा पदासाठी भाजपा पक्ष्याकडून निवडणूक लडवीत होत्या. आणि त्यांना मतदात्यांनी भरगोस मतांनी निवडून दिले. आज त्यांनी महापुरुषांना अभिवादन करून भाजपा आमदार किसन कथोरे, कुमार आईलानी, चित्रा वाघ अनेक नेते यांचे उपस्थित अंबरनाथ नगरपरिषद, नगराध्यक्षा पदाचा रीतसर पणे पदभार स्वीकाराला आहे. त्या उच्चशिक्षित असून सीए आहेत. त्या बोलत होत्या की, अंबरनाथ नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी विराजमान होण्याचा हा एक अविस्मरणीय व अभिमानास्पद क्षण आहे. लोकसेवेचा हा नवा प्रवास जनहित, पारदर्शक प्रशासन आणि अंबरनाथच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्णतः समर्पित राहील. सामान्य नागरिकांचा विश्वास, समस्या सोडविण्याची तत्परता आणि शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार यानिमित्ताने व्यक्त करीत आहे.

# नववर्षाची धुंदी; ७७९ वाहन चालकांवर, तर ३७ तळीरामांवर पोलिसांची कारवाई

**वसई : वार्ताहर**

नवीन वर्षाच्या आनंदाला कोठेही गालबोट लागू नये म्हणून पोलिस आयुक्तालयांर्तगत सर्वत्र कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. काशिमीरा, विरार आणि वसई या तिन्ही परिमंडळातील वाहतूक पोलिसांनी तळीरामांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून गुन्हे दाखल केले आहे. तिन्ही विभागाने तब्बल ७७९ प्रकरणांत लाखोंचा दंड वसूल केला आहे. वाहतूक विभागाच्या काशिमीरा पोलिसांनी ४९, वसई पोलिसांनी ४० व विरार पोलिसांनी ३७ मद्यपी वाहनचालकांवर कारवाई केली आहे. पोलिस आयुक्तालयात तिन्ही परिमंडळमध्ये बुधवारी रात्रीपासून कुठेही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता सर्वत्र पोलिस बंदोबस्त लावून नाकाबंदी करण्यात आली होती. बुधवारी सायंकाळपासूनच सर्वच जागी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवला होता. भरधाव गाडी चालविणे, विनाहेल्मेट दुचाकी चालविणे, दारू पिऊन वाहने चालविणे आदी अनेक वाहतूक नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाया करण्यात आल्या आहेत. दारू पिऊन वाहन चालवल्याबद्दल कारवाई करून ४७ वाहने जप्त केली आहेत. यात ६ कार, ४ रिक्षा, ३६ दुचाकी, १ टेम्पो जप्त करण्यात आला. वाहतूक पोलिसांनी काशिमीरा येथे १,४४९ प्रकरणे दाखल करून ३ लाख ५८ हजार २०० रुपयांचा दंड वसूल केला. ६ कार, ४ रिक्षा, ३६ दुचाकी आणि एका टेम्पो चालकावर दारू पिऊन वाहन चालवणाऱ्याची ४७ वाहने जप्त केली आहेत. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर वाहतूक ३ विविध ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. कायदा तोडणाऱ्या वाहन चालविणाऱ्यावर ७७९ कारवाया केल्या आहेत.

# भिवंडीत भाजपची विजयी घोडदौड; सहा उमेदवार बिनविरोध





**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून येण्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हे सहा ही विजयी उमेदवार हे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार असल्याने भिवंडीत भाजपाची विजयी घोटजोड सुरू झाली आहे. ज्यामध्ये एका अल्पसंख्यक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे. भिवंडी पालिकेत अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे विजयी झाले. पण आज शेवटच्या दुसऱ्या दिवशी भिवंडीत आमदार महेश चौघुले यांच्या करिष्म्या ने तब्बल पाच जणांनी बिनविरोध विजय पटकावला. प्रभाग क्रमांक १८ अ- अश्विनी सन्नी फुटाणकर, प्रभाग क्रमांक १८ ब-दीपा दीपक मढवी, प्रभाग क्रमांक १८ क- अबूसूद अशफाक अहमद शेख, प्रभाग क्रमांक १६ अ-परेश (राजू) चौघुले, प्रभाग क्रमांक २३ ब-भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले. हा विजय भाजपाच्या विकासाच्या कार्याचा विजय असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली शहरातील जनतेला विकास भाजपा पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झाल्याने मुस्लिम बाहुल्य प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यशस्वी झालो आहोत अशी प्रतिक्रिया आमदार महेश चौघुले यांनी दिली.शहरातील अल्पसंख्यांक समाज सुद्धा राष्ट्रीय एकात्मता जोपासत एकत्र काम करीत आहेत आणि हा संदेश राष्ट्राला भिवंडीतून दिला जातो याचा अभिमान असल्याची प्रतिक्रिया शेवटी आमदार महेश चौघुले यांनी दिली आहे.

**ताडाळी परिसरातून भारती चौधरी बिनविरोध**

ताडळी परिसरातील प्रतिष्ठेच्या प्रभाग क्रमांक २३ मधून भारतीय जनता पक्षाच्या भारतीय हनुमान चौधरी या बिनविरोध विजय झाल्या आहेत.ताडळी येथील प्रभाग क्रमांक २३ चे नेतृत्व करणारे ज्येष्ठ माजी नगरसेवक निलेश चौधरी यांनी केलेल्या शिष्टाईनंतर प्रभाग क्रमांक २३ ब मधील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.आणि त्यानंतर हा विजय शक्य झाला आहे अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक हनुमान चौधरी यांनी दिली आहे.यासोबत माजी नगरसेवक नारायण चौधरी,माजी महापौर तुषार चौधरी यांनी मोलाचे सहकार्य केले असल्याची प्रतिक्रिया हनुमान चौधरी यांनी दिले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या तीन उमेदवारांची आश्चर्यकारकरीत्या माघार



**उल्हासनगर : सुनील तांबे**

उल्हासनगर महापालिका निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक १५ मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तीन ही उमेदवारांनी आश्चर्यकारकरीत्या माघार घेतलीय. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवारांना पाठिंबा देत भाजप उमेदवाराचा पराभव करण्यासाठी खेळी, असेल का अशी चर्चा नागरिकांन मध्ये सुरु आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या या तीन उमेदवारांनी शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर केलाय, एकता रवि वसीटा, नीलेश बोबडे, सुरज कारकर, या उमेदवारांनी माघार घेतलीय. त्यामुळे या प्रभागात शिवसेना शिंदे गट आणि भाजप अशी थेट लढत रंगणार आहे. भाजपाच्या उमेदवारांचा पराभव करण्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाची ही सगळी खेळी असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अवघ्या दोन दिवसाआधी भाजपा पक्षात प्रवेश केला होता आणि त्यांना आणि त्यांच्या समर्थकांना प्रभाग क्रमांक १५ मधून उमेदवाऱ्या देण्यात आले.

त्यामुळे नाराज झालेल्या भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करून उमेदवारी अर्ज दाखल केले होते. आज त्याच उमेदवारांनी आश्चर्यकारकरीत्या माघार घेतली आणि शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिलाय. या वेळीशिवसेना पधादिकारी अरुण भाऊ आशान, टीम ओमीकलानी कमलेश निकम राहुल इंगळे उमेदवार निलेश बोबळे, रवी वशिठा, सुरेश कारकर आणि बरेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# वर्तक महाविद्यालयात 'आम्ही सावित्रीच्या लेकी' कार्यक्रम संपन्न



**वसई : वार्ताहर**

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय वसई येथे मराठी विभाग, राज्यशास्त्र विभाग, इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'आम्ही सावित्रीच्या लेकी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. निशिगंधा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील भित्तिपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी महाविद्यालयातील लक्ष्मी यादव या विद्यार्थिनीने स्वरचित कविता सादर केली. चेतना चव्हाण, अनुष्का सिंग, रुख्सार खान या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची ओळख करून दिली. प्राची कदम या विद्यार्थिनीने शीतल साठे यांनी लिहिलेले व गायलेले 'साऊ पेटती मशाल' हे गीत सादर केले. या सर्व विद्यार्थ्यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके, उपप्राचार्या डॉ. दीपा मुर्डेश्वर-कत्रे, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. हिरानंद खंबायत, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा. हेमंत डोंगरे, पर्यवेक्षिका डॉ. भारती तोरणे, प्रबंधक श्री. दिलीप वर्तक यांच्याबरोबरच मोठ्या संख्येने महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी गायत्री घडवले हिने केले तर कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ. भारती तोरणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जिल्हा सहकार बोर्डाच्या देवणी तालुका प्रतिनिधीपदी शंकरराव पाटील बिनविरोध

**देवणी : वार्ताहर**



लातूर जिल्हा सहकार बोर्ड निवडणुकीत देवणी तालुका प्रतिनिधी म्हणून शंकराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीत सिंधीकामठ विजयनगर येथील चेअरमन सूर्यकांत विठ्ठलराव चिंचोले यांनीही आपली उमेदवारी दाखल केली होती. पण त्यानी ऐनवेळी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे तळेगाव भोगेश्वर येथील चेअरमन शंकरराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांचा एकमात्र अर्ज शिल्लक राहिल्यामुळे ते देवणी तालुका प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवडून आले आहेत. सदरील निवडणूक बिनविरोध करण्यासाठी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक त्यांचे मोठे बंधु भगवानराव पाटील तळेगावकर व सिंधीकामट येथील सरपंच अनिरुद्ध मेळकुदे, नागतिर्थवाडीचे माजी सरपंच तुकाराम पाटील, सय्यदपूरचे बाळासाहेब पाटील व गुधाळचे चेअरमन पांडुरंग पटवारी, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सदाशिव रामचंद्र पाटील, माधवराव घोडके, व्यंकटराव पाटील, चेअरमन विष्णुदास कोनाळे, प्रभू राघोबा कोनाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या निवडीबद्दल तळेगाव भोगेश्वर येथील ग्रामदैवत श्री भोगेश्वर महादेव मंदिरात तुकाराम पाटील व बाळासाहेब पाटील यांच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा बंकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर प्रशांत पाटील, अलका बिरादार, पांडुरंग पटवारी, धनाजी जाधव, बालाजी जाधव धनाजी कोटे सदाशिव पाटील ज्ञानोबा विळेगावे आदीसह वारकरी संप्रदाय व गावकरी उपस्थित होते.

# थोडक्यात वृत्तांत

## अंगावर डिझेल ओतून तरुणाची आत्महत्या

वसई : वसई पश्चिमेकडील हंड्रेड फिट रोड येथील वाहने दुरुस्ती करणाऱ्या गॅरेजच्या दुकानात काम करणाऱ्या तरुणाने गुरुवारी सकाळी ४ वाजता स्वतःच्या अंगावर डिझेल ओतून जाळून घेतले असल्याची घटना घडली आहे. मोहम्मद अकबर असे ३५ वर्षीय तरुणाचे नाव आहे. या घटनेत तरुणाचा मृत्यू झाला आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पहाटे सुमारे चार वाजताच्या सुमारास त्याने राहत्या ठिकाणी टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केली आहे. या आगीत भाजल्याने या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी वसईच्या माणिकपूर पोलिसांना कळवले. माणिकपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. माणिकपूर पोलीस सर्व बाजूंनी तपासणी करत असून दुकानमालक व स्थानिक लोकांची चौकशी सुरू आहे.

## सामाजिक कार्यकत्याकडून ५० हजारांची मदत

लातूर : औसा तालुक्यातील मोगरगा येथील भारतबाई भाऊसाहेब जाधव या सध्या अन्ननलीकेचा कॅन्सर ने त्रस्त असुन दरमहा ७० हजार रुपये खर्च येत असल्याने मोगरगा येथील भाऊसाहेब शेषेराव जाधव हे आर्थिक विवंचनेत होते. त्यांची ही माहिती मिळताच लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी त्यांच्या मित्र परिवारास आवाहन केले व स्वतः अशी ५० हजाराची मदत केली आहे. लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी मोगरगा येथील भारतबाई भाऊसाहेब जाधव यांना अन्ननलीकेच्या कॅन्सर च्या उपचारासाठी आतापर्यंत २० लाख रुपये खर्च झाले. घरची बचत संपली. दागदागीने संपले, पुढील उपचारासाठी १६ लाख रूपयांची गरज जाधव परिवाराला आहे. ही गरज ओळखून लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी मित्र परिवाराच्या मदतीने मदत करून जाधव परिवाराला आधार दिला. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या कुटुंबीयांना जेवढी होईल तेवढी मदत करावी असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी जाधव कुटुंबीयांच्या ९६२३७४३१२५ या नंबरवर फोन पे किंवा गुगल पे करून मदत करावी असे आवाहन केले आहे.

## ईव्हीएम यंत्र चाचणी प्रक्रियेस आयुक्ताची भेट

लातूर : मनपा निवडणूकीच्या अनुषंगाने प्रशासनाची तयारी सुरु आहे. त्यासाठी सुरु असणाऱ्या मतदान यंत्र प्रात्यक्षिकास मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी भेट दिली. निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र हाताळनी व मार्गदर्शनासाठी ४२ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या उपस्थितीत यंत्राची चाचणी घेण्यात आली. महिला तंत्रनिकेतन येथे ही चाचणी घेण्यात आली. यावेळी आयुक्त श्रीमती मानसी यांनी सर्व मास्टर ट्रेनर, प्रक्रियेत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. निवडणुकी संदर्भात विविध विषयावर त्यांनी चर्चा केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे, प्रवीण इंगळे, कसगवडे, परमेश्र्वर होके व कर्मचारी उपस्थित होते.

## अर्चना गुंजाळ-शिंदे यांना पीएच. डी.

लातूर : येथील दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका अर्चना गुंजाळ-शिंदे यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी बहाल केली. गुंजाळ-शिंदे यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वुमन सबज्युगेशन अॅण्ड अमॅनसिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा: अ स्टडी' या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यानिमित्त त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली. गुंजाळ-शिंदे यांच्या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, निवृत्त प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ, सतीश पवार, रणधीर निंबाळकर, ईश्र्वरप्रसाद बिदादा आदींनी अभिनंदन केले.

## प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी.

लातूर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली. प्रा. शिंदे-भांडवलकर यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आमोस टुटुओला यांच्या निवडक साहित्यकृतींमधील लोकसाहित्याचा अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध तयार करून विद्यापीठाला सादर केला. त्यांच्या संशोधनात आफ्रिकन साहित्यातील लोकसाहित्य, लोककथा, मिथक व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करण्यात आला. प्रा.शिंदे-भांडवलकर यांना पीएच.डी. मिळाल्यानिमित्त प्रा.डॉ. अनिल कट्टे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ.पांडुरंग शितोळे, डॉ.समाधान पवार यांनी अभिनंदन केले.

## लिपीक टंकलेखक (गट-क) पदाची भरती

लातूर : सैनिक कल्याण विभागातील लिपीक टंकलेखक (गट-क) सरळसेवा पदभरती जाहिरात ४ नोव्हेंबर, २०२५ व शुध्दीपत्रक १२ डिसेंबर, २०२५ विभागाच्या संकेतस्थळावर रोजी प्रसिध्द झाली आहे. अर्जदारांना ऑनलाईन अर्ज भरतीसाठी वेबलिंक देण्यात आली आहे. परंतु, सैनिक कल्याण विभागाचे संकेतस्थळ तांत्रिक कारणाने २६ डिसेंबर, २०२५ पासून निष्क्रिय झाल्याने इच्छुक उमेदवार वेबलिंकपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यामुळे ऑनलाईन अर्ज भरण्यास ९ जानेवारी, २०२६ संध्याकाळी २३.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी https://cdn3.digialm.com/EForms/configuredHtml/32786/96173/Index.html या वेबलिंकचा वापर करुन ऑनलाईन अर्ज भरावेत, असे लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## युवा माहेश्वरी समाजाकडून ५०० शालींचे वाटप

लातूर : कडाक्याच्या थंडीने सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरजू व गरीब रुग्णांना थंडीपासून संरक्षण मिळावे, यासाठी युवा माहेश्र्वरी समाज लातूरच्या वतीने तब्बल ५०० गरम शालींचे पांघरून घालण्यात आले. थंडीने कुडकुडणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर यामुळे दिलासा आणि समाधान दिसून आले. लातूर शहरातील युवक एकत्र येऊन स्थापन केलेल्या युवा माहेश्र्वरी समाज संघटनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत.

05 TO 11 JANUARY 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/3/2026 9:30 PM Page 1



पान १ वरून....

## मुल होत नसल्याने वादाची ठिणगी...

दारू पिऊन येत असल्याने घरात नेहमी पत्नी प्रियांका सोबत भांडणे होत होती. तो दारूच्या नशेत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन आणि मुलबाळ होत नसल्याचा दोष तिला देवुन तो तिला शिव्या देत मारहाण करीत होता. खरे तर मुल होण्यासाठी त्या दोघांनी बरेच प्रयत्न केले होते. औषधउपचार दवाखाना कुणी काही सांगेल तो उपाय ही केला. परंतु काही फरक पडला नाही. मुल न होण्याचा दोष हा आकाशमध्येच होता. परंतु तो आपला दोष लपवित पत्नी प्रियांकामध्येच काही तरी कमी असल्याचे सर्वाना सांगत होता. त्यामुळे प्रियांकाचे कुणी काही ऐकत नव्हते. नातेवाईक आणि कुटूंबातील सासरचे लोक तिलाच दोष देत आकाशला दुसरे लग्न करण्याचा सल्ला देवू लागले होते. या कारणातून नवरा बायकोची भांडणे वाढीस लागली होती. आपला दोष लपवित आकाश हा दुसऱ्या लग्नासाठी तयार होता. त्यासाठी तो पहिली पत्नी प्रियांकाला घटस्फोट ही मागत होता. परंतु प्रियांकाला आपल्यात दोष नाही हे माहित असल्याने ती त्याला घटस्फोट दयायला तयार नव्हती. याचा त्याला राग येत होता. नवरा बायकोच्या भांडणात प्रियांकाच्या माहेरच्या लोकांनी मध्यस्थी करून दोघांना ही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु आकाशला दुसरे लग्न करायचे असल्याने आपल्या मेहुण्याला आणि इतर सासरवाडीच्या लोकांना तो दमदाटी करू लागला होता. त्याचा मेहुणा सागर रामदास आडगळे याने ही बहिण प्रियांका आणि भावोजी यांना काही दिवस तुम्ही आमच्या इथे येवून राहवा परंतु भांडण तंटा काही करू नका असे सांगितले. तरी ही त्याची भांडणे काही मिटली नाहीत. आकाश हा कामावरून घरी येताना रोज दारू पिऊन येवून प्रियांकाच्या चारित्र्यावर संशय घेत तु वांझ आहेस तु माझ्या घराला वारस देवू शकत नाहीस असे म्हणत तिला हातात सापडेल त्या वस्तुने मारहाण करीत होता. नवरा बायकोची भांडणे रोजचीच असल्याने आकाशच्या आई-वडिलांनी ही हल्ली त्याच्या भांडणात पडण्याचे कमी केले होते. गुरूदत्त कॉलनीत ते नवरा बायको दोघेच राहयला असल्याने त्याची भांडणे विकोपाला गेली. त्यातच प्रियांका ही भांडण करून आपल्या माहेरी नानगाव येथे आठ पंधरा दिवस जात असल्याने आकाशच्या मनात भलतेच येत होते. त्याच्या संशयला बळकटी मिळत होती. तिचे लग्नाअगोदर पासून माहेरमधील कुठल्या तरी तरूणाबरोबर संबंध असावेत म्हणून ती तिच्या माहेरी जाते अशी शंका त्याला येत होती. ती परत त्याच्याकडे आली की तो रागाच्या भरात तिला माहेरी कोणासोबत झोपून आलीस, त्याच्या सोबत किती वेळा मज्जा मारलीस असे विचारून तिच्यावर नको नको ते आरोप करीत होता. त्यामुळे ती ही भांडणात त्याला उलट उत्तरे देत तुझ्यात दम आहे का? हे विचारून ती ही त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवू लागली होती. ती आपल्याला उलट बोलते म्हणून तो तिच्यावर जास्तच चिडत होता. मला मुल होत नाही हा काही माझा दोष नाही, जमीन पिकाऊ असेल तर तिला खत पाणी करून तिची मशागत केली की, पेरणी होते हे ती त्याला सांगत होती. त्यामुळे तो ही तिला मारहाण करीत तिचे जीवन तिला नको करून सोडत होता. अशातच त्याने मागील आठवडयात कामावर न जाता सुट्टी घेतली. या सुट्टीच्या दिवसात तो जास्तच दारू पिऊ लागला. शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी त्याने जास्तच दारू पिली. तो दारूच्या नशेतच घरी आला. दारूच्या नशेत तो उशिरा रात्री घरी आल्याने प्रियांका त्याच्यावर चिडली होती. तो हलत डुलत नशेत घरी आल्यावर ती त्याच्यावर खेकसत त्याला म्हणाली, आला का महाराज मुतू पिऊन त्यापेक्षा नीट वागा. दारू पिल्यावर तुम्ही नशेत झोपणार मग मुल कसे होणार, असे म्हणून ती त्याच्या वर्मावर बोट ठेवली. प्रियांका ही ताळतंत्र सोडून आपल्यालाच नको ते बोलते याचा त्याला राग आला. तु दुसऱ्याबरोबर झोपणार, तुझा यजमान कोण आहे मला माहित आहे म्हणत त्याने तिचे केस ओढले. ती ओरडू लागली. तु रांड म्हणत त्याने तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देत तु माझ्या घरात राहू नकोस असे म्हणत तिला घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ती ही त्याला अर्वाच्च भाषेत बोलत त्याला तुझ्यात दोष आहे आणि मला मुल होत नाही असे म्हणतोस असे म्हटले. याचा राग त्याला आला. त्याने तिचा गळा रागाच्या भरात आवळून धरला. ती त्याला मला सोडा म्हणत त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागली. परंतु त्याने तिचा गळा इतक्या जोरात आवळून धरला की, तिला काहीच हालचाल करता आली नाही. काही क्षणातच ती डोळे पांढरे करून जमिनीवर खाली पडली. तिची हालचाल मंद झाल्याचे त्याने तिच्या नाकाला हात लावून पाहिले. आपल्या हातून पत्नीचा खून झाल्याचे बघून तो खाली डोक्याला हात लावून बसला. काही वेळाने त्याने सिंहगड येथे राहत असलेल्या आपल्या आई वडिलांना आणि घरच्या लोकांना फोन करून सांगितले की, मी प्रियांकाचा गळा आवळून खून केला आहे असे सांगितले. नवरा बायकोच्या भांडणाचा असा शेवट होईल असे आकाशच्या घरच्या लोकांना स्वप्नात ही वाटले नव्हते. त्याचे आई वडिल आणि इतर नातेवाईक हे हडपसर फुरंसुंगी येथील गुरूदत्त कॉलनी येथे आले. घटनास्थळी पै पाहुण्यांनी आणि शेजाऱ्यांनी गर्दी केली. या घटनेनंतर आकाश दोडके हा रात्री उशिरा फुरसुंगी पोलीस स्टेशनला स्वतःहून गेला. तेथे कर्तव्यावर हजर असलेल्या पोलीसांना त्याने मी माझ्या पत्नीचा गळा आवळून खून केला आहे असे सांगितले. त्याने खून केल्याचे ऐकताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला गुरूदत्त कॉलनी येथील त्याच्या घरी घेवून आले. घटनास्थळी प्रियांका ही उताण्या अवस्थेत पडली होती. तिचा गाऊन ही मांडयापर्यत वर गेला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत प्रियांका दोडके हिच्या नानगाव येथील माहेरच्या लोकांना कळवली. ते ही लागलीच या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आले. तिच्या माहेरच्या लोकांनी तिच्या सासू सासरे आणि नवऱ्यावर आरोप करीत प्रियांकाला मुल होत नसल्याच्या कारणातून छळ करीत असल्याचा आरोप केला. घटनास्थळावरील पंचनामा करून पोलिसांनी मृतदेह उतरीय तपासणीसाठी ससुन रुग्णालयात पाठवून दिला. स.पो. निरी. नानासाहेब जाधव यांनी संशयीत आरोपी आकाश दोडके याच्याकडून या घटनेची माहिती घेतली. त्याने कोणते ही आढेवेढ न घेता आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलिसांनी या घटनेची फिर्याद मयत प्रियांका दोडके हिचा भाऊ सागर रामदास आडगळे (वय ३५) रा.नानगाव दौड याच्याकडून फिर्याद लिहून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी प्रियांका आकाश दोडके (वय २७) रा. गुरूदत्त कॉलनी, फुरसंगी पुणे हिच्या खून प्रकरणी तिचा नवरा आकाश विष्णु दोडके (वय ३४) रा. गुरूदत्त कॉलनी, फुरसंगी, पुणे याच्या विरोधात भादंवि कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याला प्रथमवर्ग कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास फुरसुंगी पोलीस स्टेशनेचे सहा.पोलीस निरीक्षक नानासाहेब जाधव हे करीत आहेत.

## झालेल्या अपमानामुळे दिनेश सुडाने ...

एक तरुणी देखील कामाला लागली. दिनेश आणी ती तरुणी दोघेही एकाच पदावर एकाच संस्थेत सोबतचकाम करत होते. एक तरुण व एक तरुणी असे जोडीने ग्राहकांना माहिती देण्यासाठी फिल्डवर जाण्याचा सध्या विविध कंपन्यांमधे ट्रेंड आला आहे. टवटवीत चेहऱ्याची, सुमधुर आवाजातील तरुणी कंपनीचे प्रमोशन करण्यासाठी अथवा माहिती देण्यासाठी समोर आली अथवा फोनवर बोलली म्हणजे बहुसंख्यग्राहक जोडले जातात. ग्राहकांची ही मानसिकता हेरुन तरुणींना नोकरीत प्राधान्य दिले जाते. सध्या अशा कपल अर्थात जोडीदार नोकरदारांचा जमाना आला आहे. दिनेश आणि ती तरुणी दोघेही एकदम तरुण होते. दिनेश तिला सिनीअर होता. त्यामुळे फिल्डची माहिती देण्यासाठी दिनेश तिला मोटार सायकलवर डबलसिट नेत असे. दोघे एकदम तरुण आणि एकाच वयाचे असल्यामुळे साहजीकच दोघांचे विचार जुळण्यास वेळ लागला नाही. एकाच मोटार सायकलवर दोघे फिल्डवर जात येत असल्यामुळे साहजीकच दोघांचा एकमेकांना स्पर्श होत असे. हसत खेळत दोघे सोबतीने नोकरी करत होते. ती तरुणी जामनेर येथील रहिवासी होती. तिच्या घराजवळ निलेश राजेंद्र कासार नावाचा तरुण रहात होता. एकाच परिसरात दोघे राहणारे असल्यामुळे निलेश कासार त्या तरुणीला चांगल्याप्रकारे ओळखत होता. तिच्याबद्दल निलेशच्या मनात कुठेतरी प्रेमाचा अंकुर फुलला होता. ती दिसली म्हणजे टीव्हीवरील जेठालालप्रमाणे निलेशची कळी खुलत असे आणि त्याचाचेहरा प्रफुल्लीत होत असे. ती दिसली म्हणजे निलेशच्या रोमारोमात उर्जा आणि चैतन्य निर्माण होऊन त्याचा दिवस प्रसन्न जात असे. त्या तरुणीला आपल्याच तालुक्यातील खासगी संस्थेत नोकरी मिळाल्याचे निलेश कासार याला समजले. ती कुठे नोकरीला जाते, काय काम करते, केव्हा परत येते याची निलेशने माहिती घेण्यास सुरुवात केली. तिच्याबद्दल त्याच्या मनात प्रेमभावना होती. आपल्या मनाच्या एका कप्प्यात त्याने तिच्यासाठी स्पेस करुन दिली होती. ती तरुणी दिनेश चौधरी या सहकाऱ्यासोबतत्याच्या मोटार सायकलवर डबलसिटफिरत असल्याचे निलेशने एके दिवशी पाहिले. दुस-या तरुणासोबत ती हसत खिदळत फिरत असल्याचे बघून निलेशच्या मनाचा तिळपापड झाला. त्याच्या मनाची तार गिटारच्या तारेप्रमाणे तुटली. डर चित्रपटातील शाहरुख खान प्रमाणे निलेशच्या मनाची घालमेल करणारीअवस्था झाली. तो तिला आपली समजत होता. समोरचा दिनेश त्याला जणूकाही डर चित्रपटातील सनी देओल प्रमाणे भासू लागला. ती माझी आहेती फक्त माझीच आहे असे निलेश मनाशी म्हणू लागला. दिनेशसोबत ती मोटार सायकलवर डबलसीट बसल्याचे दृश्य बघून निलेशची झोप उडाली. ते दृश्य निलेशला अस्वस्थ करत होते.दिनेश ऐवजी तिने आपल्या सोबत मोटार सायकलवर बसावे असे निलेशला वारंवार वाटत होते. ती निलेशसोबत मोटार सायकलवर डबलसिट बसल्याचे दृश्य वारंवार त्याच्या नजरेसमोर येत होते. तिला दिनेशसोबत डबलसिट बघून निलेशच्या मनाची घालमेल सुरु होती. आपल्याच परिसरात राहणा-या त्या तरुणीचा दिनेशला वारंवार स्पर्श होत असल्याचा निलेशला भास होऊ लागला. त्यामुळे तो स्वत:वरच मनातल्या मनात चिडू लागला. तो अस्वस्थ झाला. या दिनेशचे काय करावे असा विचार त्याच्या मनात घोळू लागला. एके दिवशी तो दिनेशच्या पाळतीवर गेला. त्याने दिनेशवर पाळत ठेवली. फिल्डवरुन ऑफीसमधे परत जाणाऱ्या दिनेशला निलेश कासार याने रस्त्यातच अडवले. तु माझी वाट का अडवली असा दिनेशने निलेशला सवाल केला. तु तिच्यासोबत मोटार सायकलवर का फिरतो असा प्रतिप्रश्न निलेशने दिनेशला केला. काही कळण्याच्या आतच निलेशने दिनेशच्या कानशिलात लगावली. तु मला का मारले? असा दुसरा प्रश्न दिनेशने केला. या वेळी देखील काही कळण्याच्या आत निलेशने दिनेशला पुन्हा दोन वेळा कानशिलात लगावल्या. यापुढे तु तिच्यासोबत डबलसिट फिरायचे नाही असा सज्जड दम निलेशने दिनेशला दिला. मार खावून सज्जड दम मिळाल्यानंतर दिनेश मुकाटपणे ऑफीसमधे गेला. त्यानंतर निलेश देखील आपल्या मार्गाला गेला. त्या दिवसापासून दिनेशने त्या तरुणीसोबत फिल्डवर जाणे बंद केले. तो एकटाच फिल्डवर जावू लागला. मात्र निलेशकडून मिळालेली थप्पड आणि त्याने त्याने दिलेला सज्जड दम दिनेश विसरला नाही. हा सर्व घटनाक्रम त्याने त्याचा मित्र भुषण पाटील याला कथन केला. दरम्यानच्या कालावधीत दिनेशला दुसऱ्या एका संस्थेत रिकव्हरी ऑफीसर या पदावर चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. त्यामुळे त्याने नव्या संस्थेत काम सुरु केले. मात्र तरी देखील त्याचे त्या तरुणीसोबत काही ना काही निमीत्ताने फोनवर बोलणे सुरुच होते. त्यानंतर चारच महिन्यात दिनेशला अजून दुसऱ्या संस्थेत चांगल्या पगाराची आणि नव्या पदाची ऑफर आली. त्यामुळे त्याने ती नोकरी सोडून नव्या संस्थेत काम सुरु केले. मात्र योगायोगाने अथवा दुर्दैवाने या संस्थेत निलेश कासार हा देखील कामाला होता. तरुणीसोबत मोटार सायकलवर फिरत असल्याच्या कारणावरुन झालेला वाद आणी त्या वादातून मार देणारा आणि मार खाणारा दोघे एकाच ठिकाणी नोकरीवर होते. त्यामुळे भुतकाळात मार खाणारा दिनेश आता भविष्यात निलेशला मार देण्याचा विचार करु लागला. दिनेशने हा प्रकार आणि मनातील विचार पुन्हा एकदा त्याचा मित्र भुषण पाटील याच्या कानावर टाकला. निलेशकडून कानशिलात झालेली मारहाण आणि जिव्हारी लागलेला अपमानकसा भरुन निघेल याचा विचार दिनेशला स्वस्थ बसू देत नव्हता. मित्र भुषण याच्या मदतीने निलेशचा गेम करण्याचा विचार दिनेश करत होता. निलेशचा काटा काढण्यासाठी दिनेशने शांत चित्ताने विचार करण्यास सुरुवात केली. काटा काढण्यासाठी दिनेशने निलेश कासार याच्यावर मैत्रीचे जाळे फेकण्यास सुरुवात केली. दिनेशने त्याच्या मनातील योजनेचा निलेशला थांगपत्ता लागू दिला नाही. त्याच्यासोबत त्याने मैत्री वाढवली. या बनावट मैत्री दरम्यान निलेशच्या बँक खात्यात विस ते पंचविस लाख रुपये असल्याचे दिनेशच्या लक्षात आले. निलेशचे जवळचे नातेवाईक पुणे येथे राहतात. त्या नातेवाईकांनी निलेशच्या काकांची शेती खरेदी केली होती. जवळपास पन्नास लाख रुपयांचा तो व्यवहार असल्याचे समजते. निलेशच्या काकांना शेतीच्या व्यवहाराची काही रक्कमनिलेशच्या माध्यमातून दिली जात होती. त्या व्यवहारातील सुमारे विस लाख रुपये त्यांनी निलेशच्या खात्यावर टाकून ठेवले होते. निलेश ज्यावेळी फोन पे च्या माध्यमातून किरकोळ व्यवहार करत होता त्यावेळी दिनेश ते बघत असे. त्यावेळी निलेशच्या खात्यातील बॅलन्स रक्कम दिनेशच्या नजरेस पडत होती. निलेशच्या खात्यात लाखो रुपये शिल्लक असल्याची बाब दिनेशच्या लक्षात आली. निलेशच्या खात्यातील भलीमोठी रक्कम आपल्या खात्यात वर्ग करुन घेण्याची देखील युक्ती दिनेशने मनाशी आखली. त्या दृष्टीकोनातून दिनेशने निलेशसोबत काही ना काही निमित्ताने फोनवर बोलण्याचा आणि प्रत्यक्ष भेटण्याचा सपाटा सुरु केला आणि मैत्रीचा बनाव केला. दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळीसाडे सात वाजता दिनेश चौधरी आणि भुषण पाटील हे दोघे मित्र एकत्र आले. दोघांनी निलेशचा गेम करण्यासह त्याच्या खात्यातील लाखो रुपयांची रक्कम मोबाईलद्वारे आपल्याखात्यात वर्ग करण्याची योजना आखली. भुषणच्या शेतात मद्यपान आणि मांसाहारी जेवणाचे आयोजन करण्यात आले. या पार्टीत निलेशला मद्यपानासाठी बोलावण्याचे निश्चित झाले. त्यानुसार १५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी दिनेशने निलेशला त्याच्या व्हाट्स ॲप क्रमांकावर कॉल केला. भुषण पाटील याच्या शिरसोली येथील शेतात सायंकाळी सात वाजता मांसाहारी जेवण आणि मद्यपानाचा बेत आखल्याचा निरोप निलेशला देण्यात आला. निरोप मिळताच निलेश कासार त्याच्या मोटार सायकलने जामनेरहून शिरसोली येथे दिनेशकडे आला. आपण मद्यपानाच्या पार्टीला नव्हे तर यमलोकांच्या पार्टीला जात आहोत याची निलेशला कल्पना नव्हती. निलेश येताच दिनेशने त्याचा मित्र भुषणचा ठावठिकाणा घेतला. भुषण त्याच्या शेतातच असल्याचे समजल्यानंतर दिनेशने निलेशला त्याठिकाणी नेले. दिनेश आणिभुषण या दोघांनी ठरवून निलेशला मोठ्या प्रमाणात दारु पाजली. अती मद्यप्राशनामुळे निलेश नशेत गुंग झाला. तो नशेत असल्याचे बघून दोघांनी मिळून त्याच्या बँक खात्यातील मोठी रक्कम त्याच्या मोबाईलद्वारे आपल्या खात्यात वर्ग करण्याचा प्रयत्न सुरु केला. मात्र त्याचवेळी त्यांच्यात वादाची ठिणगी पडली. आपल्याला झालेल्या मारहाणीचा बदला घेण्याचे दिनेशचे नियोजन असतांनाच निलेश उठून परत जावू लागला. निलेश परत जात असल्याचे बघून वेळ न दडवता दिनेश आणि भुषण या दोघांनी त्याला पकडून ठेवले. दोघांनी मिळून त्याला दोरीने गळफास दिला. या गळफासामुळे निलेशचा गुदमरुन जीव गेला. त्याने मद्याच्या नशेत अखेरचा श्वास घेत या जगाचा निरोप घेतला. अशाप्रकारे मद्याच्या पार्टीसाठी आलेल्या निलेश कासार या तरुणाचा जीव गेला. आता निलेशच्या मृतदेहाचे करायचे काय? हा प्रश्न दिनेश आणी भुषण या दोघा मित्रांना पडला. निलेशच्या मृतदेहाची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्यासाठी दोघांनी कंबर कसली. निलेशचा मृतदेह एका पोत्यात टाकून त्यांनी तो नजीकच्या नेव्हरे धरणातील पाण्यात टाकून दिला. ज्या दोरीने त्यांनी निलेशला गळफास दिला ती दोरी त्यांनी परिसरात फेकून दिली. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात दोघांनी तेथून पलायन केले. दिनांक १६ डिसेंबर २०२५ चा दुसरा दिवस उजाडला तरी देखील निलेश कासार घरी परत आला नाही. त्यामुळे त्याच्या घरातील सदस्य हैरान झाले. ते त्याचा शोध घेऊ लागले. आदल्या रात्री त्याचे वडील राजेंद्र कासार यांनी त्याला त्याच्या मोबाईलवर फोन केला होता. त्यावेळी आपण शिरसोली येथे दिनेश चौधरी याच्याकडे पार्टीला जात असल्याचे त्याने वडीलांना सांगितले होते. रात्री बराच वेळ त्यांनी वाट पाहिली मात्र निलेश घरी परत आला नाही. त्याचे वडील राजेंद्र कासार यांनी त्याच्यासोबत मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र निलेशचा मोबाईल देखील लागत नव्हता. त्यामुळे दुस-या दिवशी गावकऱ्यांच्या मदतीने त्याच्या वडीलांनी बेपत्ता निलेशचा शोध सुरु केला. दरम्यान दुसऱ्या दिवशी १६ डिसेंबर रोजी बेपत्ता निलेशची मोटार सायकल रामदेव वाडी गाव शिवारातील पाण्याच्या तळ्याजवळ रस्त्याच्या कडेला आढळून आली. मुलगा निलेशचे अपहरण अथवा त्याचा घातपात झाला असावा अशी त्यांना शंका येण्यास सुरुवात झाली. त्यामुळे निलेशचे वडील राजेंद्र कासार यांनी एमआयडीसी पोलिस स्टेशनला तो बेपत्ता झाल्याबाबतमिसींग दाखल केली. बेपत्ता होण्यापुर्वी निलेश हा त्याचा मित्र दिनेश चौधरी याच्याकडे गेला होता आणि यापुर्वी त्या दोघांमधे वाद झाले होते अशी माहिती मिसींग दाखल करतेवेळी त्यांनी एमआयडीसी पोलिसांना दिली. त्या माहितीच्या आधारे एमआयडीसी पोलिसांनी पुढील तपास सुरु केला. बेपत्ता निलेशचा एमआयडीसी पोलिसांमार्फत तपास सुरु होता. बेपत्ता निलेशचे बेपत्ता होण्याच्या दिवशी कुणाकुणासोबत मोबाईलवर बोलणे झाले. त्याला शेवटचे कुणी पाहिले याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली. तपास सुरु असतांना १९ डिसेंबर रोजी शिरसोली परिसरातील नेव्हरे धरण परिसरात एका तरुणाचा पोत्यात बांधलेला मृतदेह गावक-यांना आढळून आला. या घटनेची माहिती लागलीच एमआयडीसी पोलिसांना कळवण्यात आली. माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. हा मृतदेह कदाचीत बेपत्ता निलेश कासार याचा असू शकतो अशी शंका पोलिस पथकाला आली. त्यांनी मिसींग दाखल करणारे राजेंद्र कासार यांना याबाबत माहिती देत मृतदेहाची ओळख पटवण्यास बोलावले. जामनेर येथील रहिवासी राजेंद्र कासार यांनी त्यांचा भाऊ अनिल कासार याच्यासह लागलीच शिरसोली परिसरातील नेव्हरे धरण परिसर गाठले. घटनास्थळी सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ व त्यांचे सहकारी हजर होते. त्यांच्यासोबत संशयीताच्या रुपात दिनेश चौधरी व त्याचा मित्र भुषण पाटील हे दोघेही हजर होते. धरणाच्या पाण्यात मृतदेहाचे तरंगणारे पोते बाहेर काढण्यात आले. त्या पोत्यातून बाहेर काढण्यात आलेला मृतदेह राजेंद्र कासार यांना दाखवला असता तो त्यांनी लागलीच ओळखला. तो मृतदेह त्यांचा मुलगा निलेश कासार याचाच होता. अशा प्रकारे मृतदेहाची ओळख पटली आणी मिसींगचा तपास पुर्ण झाला. मिसिंगचा तपास पुर्ण झाला असला तरी घातपाताचा संशयास्पद प्रकार पुढे आला. घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा आदी कायदेशीर सोपास्कार पुर्ण करण्यात आले. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीकामी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रवाना करण्यात आला. सर्व घटनाक्रमाला अनुसरुन मयत निलेश कासार याचे वडील राजेंद्र कासार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला याप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.न. ९११/२०२५ भारतीय न्याय संहिता १०३, २३८, ३ (५) नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरु केला. मयत निलेश कासार हा त्याचा मित्र दिनेश चौधरी याच्याकडे पार्टीसाठी गेला होता. तसेच दोघात यापुर्वी कडाक्याचा वाद झाला असल्याची पोलिसांना माहिती मिळाली होती. घटनेच्या रात्री निलेश आणि दिनेश या दोघांमधे मोबाईल संभाषण देखील झाले होते. मयत निलेश कासार, दिनेश चौधरी आणि भुषण पाटील या तिघांचे मोबाईल लोकेशन देखील एकाच ठिकाणी आढळून आले होते. या सर्व तपासाच्या आधारे दिनेश चौधरी आणी भुषण पाटील या दोघांना संशयीत आरोपी म्हणून अटक करण्यात आली. दोघांना न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले असता न्यायालयाने सुरुवातीला त्यांना पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान दोघांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. मात्र सखोल चौकशीअंती त्यांनी आपला गुन्हा कबुल करत गुन्ह्याचा सर्व घटनाक्रम कथन केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक राहुल तायडे, सहायकफौजदार विजयसिंग पाटील, हे.कॉ. प्रमोद लाडवंजारी,किरण पाटील व किरण चौधरी, पो.कॉ. सुभाष साबळे आदी करत आहेत.

## चारित्र्याच्या संशयाने पती हैवान...

आई ताराबाई हरी म्हस्के आणि आजी असे एकूण सहा जण शिक्षक कॉलनीतील घरात वास्तव्यास होते. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या राहुल म्हस्केने अचानक घरात ठेवलेली कुऱ्हाड उचलली आणि पत्नी रूपाली आणि मुलगा रियांश यांच्या डोक्यावर वार केले. सपासप वार केल्यामुळे ४ वर्षाचा रियांश हा जागेवरच कोसळला. तर बायको रुपाली ही गंभीर जखमी झाली. घरात किंचाळण्याचा आवाज ऐकून शेजारी धावून आले. समोरील दृश्य पाहून सगळेच हादरले. शेजाऱ्यांनी तातडीने रुपालीला नजीकच्या रुग्णालयात दाखल केलं. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपी राहुल मस्के याला ताब्यात घेतलं आहे. पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती ठाणेदार व्यंकटेश आलेवार यांच्याकडून प्राप्त झाली. घटनेमागील नेमकं कारण, संशयाची पार्श्वभूमी आणि आरोपीच्या मानसिक स्थितीबाबत चौकशी करण्यात येत आहे, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

पान ८ वरून....

## रेणापूरच्या लोकनियुक्त भाजपाच्या ...

ही जनतेची असतील, नागरी सुविधासह रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरपंचायतीचे ज्ञानदेव दहिफळे यांनी केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघे मिळून निश्र्चितपणे रेणापूरच्या विकासाला गती देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली. याप्रसंगी भाजपाचे बापूसाहेब कुलकर्णी, अच्युत कातळे, श्रीनिवास अकनगिरे, चंद्रकांत कातळे, दिलीप आकनगिरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, उज्वल कांबळे, दिलीप राजे, राजकुमार आलापुरे, महेश काळे, हनुमंत भालेराव, उमेश सोमाणी, धनराज बरुरे, बंडू एचवाड, प्रभाकर बोरुडे, सुरेश भंडारे, उत्तम चव्हाण, दिलीप चव्हाण, गणेश चव्हाण, सुभाष राठोड, शेख अजीम, नरसिंग येलगटे, शिवाजी भावे, अंगद काळे, संजय वीरुळे, राजकुमार आकनगिरे, शेख शहंशाह, साधू लोकरे, खुद्दुस शेख, अंकित हाके, शंकर चक्रे, नंदकुमार बंडे, जगन्नाथ कातळे, सलीम शेख, शरद चक्रे, अंकुश मोटेगावकर, योगेश राठोड, कुमार आकनगिरे, धम्मानंद घोडके, ज्ञानेश्र्वर शिंदे, निलेश हुलगुंडे, मुनाफ शेख, सुरेश खोबरे, मनोज चक्रे, साताप्पा खोबरे, फारूक कुरेशी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी रेणापूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर ...

स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, तांत्रिक साधनसामग्री व वैज्ञानिक पुराव्यांचा प्रभावी वापर करून तपास अधिक गुणवत्तापूर्ण, पारदर्शक व परिणामकारक करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. गुन्ह्यांचा निपटारा वेळेत होऊन दोषींना कायदेशीर शिक्षा मिळवून देणे हे पोलिसांचे मूलभूत कर्तव्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**कायदा व सुव्यवस्था, शिस्त व पारदर्शकता**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेताना शहाजी उमाप यांनी अवैध धंदे, गुटखा विक्री, मटका, अवैध दारू विक्री व इतर समाजविघातक कृत्यांविरुद्ध झिरो टॉलरन्स’ धोरण राबविण्याचे स्पष्ट आदेश दिले. कर्तव्यात कसूर, भ्रष्टाचार किंवा गैरप्रकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात आली असून, भविष्यातही अशीच कठोर व पारदर्शक भूमिका कायम राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या तक्रारींचे तत्पर, पारदर्शक व संवेदनशीलतेने निवारण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या संवेदना’ उपक्रमावर शहाजी उमाप यांनी विशेष भर दिला. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाशी सन्मानपूर्वक व मानवी दृष्टिकोनातून वागणूक दिली जावी, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ व्हावा तसेच पोलीस प्रशासन अधिक जनाभिमुख व्हावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

## मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य ...

होऊन राष्ट्रीय विकासामध्ये आपला मोलाचा हातभार लावणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मतदान जनजागृती करण्यासाठी उभारलेला सेल्फी पॉईंट व कलेच्या माध्यमातून झालेली जनजागृती. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. संदिपान जगदाळे व महाविद्यालयातील संगीत व नाट्य विभागातील प्राध्यापकांच्या चमूने पोवाड्याचे सादरीकरण केले, तर मनपा शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार भारूडा सादर करून मतदानाचे महत्त्व पटवून दिले. या सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या अभियानास मनपा अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मनपा शिक्षणाधिकारी श्र्वेता नागणे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि प्रा. डॉ. शिवकुमार राऊतराव, सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. दशरथ ननवरे यांनी केले, तर आभार मधुकर ढमाले यांनी मानले.

## बाई-काकाजी पॉलिमर्स लि....

विचार व्यक्त करताना इंद्रनील नाईक यांनी बाई-काकाजी समूहाने आजपर्यंत कमावलेल्या सर्वांच्या विश्वासाच्या बळावर हा टप्पा गाठल्याचे सांगितले. भारताच्या एकूण जीडीपीत सर्वाधिक योगदान महाराष्ट्राचे राहत आले आहे. प्रत्येकाने शेअर बाजारातील ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्राचा जीडीपीतील प्रथम क्रमांकचे योगदान यापुढेही कायम राहू शकणार आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालन्यानंतर सर्वात मोठी इंडस्ट्री लातुरात आहे. मुंदडा परिवाराच्या या कंपनीच्या माध्यमातून लातूरचे नाव आता उद्योग क्षेत्रात आघाडीवर पोहचण्यास मदत झाली आहे. विकासात उद्योग हा महत्वाचा कणा आहे. शासन कायम उद्योग धंद्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करत असल्याचे सांगून नाईक यांनी बाई-काकाजी पॉलिमर्स लि. या कंपनीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आ.अमित देशमुख यांनी यावेळी बोलताना आजचा दिवस लातूरच्या उद्योजकीय क्षेत्रासाठी अतिशय आनंदाचा आणि अभिमानाचा असल्याचे सांगितले. आयपीओधारक कंपनीचा लिस्टिंग समारंभ लातूरमध्ये होण्याची ही पहिलीच वेळ आहे. लातूरच्या जडणघडणीत व्यापारी - उद्योजकांचे योगदान सर्वाधिक आहे. लातूरचे दुसरे नाव गुणवत्ता हे असून या गुणवत्तेच्या बळावरच ही कंपनी लिस्टिंग होतेय असे गौरवोद्गारही आ. देशमुख यांनी काढले. सगळ्यांच्या उचित योगदानामुळे लातूरच्या विकासाचा पाया मजबूत बनला आहे. स्व. विलासरावजी देशमुख आज आपल्यात असते तर त्यांनाही खूप आनंद झाला असता, ते मुंदडा परिवाराच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभे राहिल्याची आठवणही आ. अमित देशमुख यांनी करून दिली. उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी नवीन उद्योगासाठी प्रयत्न करावा, असे आवाहनही आ. देशमुख यांनी केले. बाई - काकाजी उद्योग समूहाचे प्रमुख बालकिशन मुंदडा यांनी आपल्या प्रास्ताविकात संघर्ष, अनुशासन आणि विश्वासाच्या बळावर आपल्या कंपनीने हे यश संपादन केले आहे. प्रामाणिकपणे कार्य केल्याने आज आपल्या उद्योग समूहाने भांडवली बाजारामध्ये पदार्पण केले आहे. आजपासून ही कंपनी प्रत्येक गुंतवणूकदाराची आहे. गुंतवणूकदारांना त्यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या परताव्याबद्दल त्यांनी खात्री दिली. उद्योग समूहाच्या या यशामागे एक समर्पित टीम असून हे सामूहिक यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हरिकिशन मुंदडा यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना आजचा दिवस आपल्या कंपनीसाठी एक मैलाचा दगड ठरला असून ही एका नव्या जबाबदारीची सुरुवात असल्याचे आपण मानतो, असे सांगितले. बँकिंग पार्टनर अभिजित पांडे यांनी आपल्या मनोगतात बाई-काकाजी पॉलिमर्स लि. ही १४२वी आयपीओ लिस्टेड कंपनी असल्याचे सांगितले. बीएसईचे राम गिरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यास प्रदीप राठी, माने, लक्ष्मण मोरे, डॉ.अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, सीए प्रकाश कासट, लक्ष्मीकांत कर्वा, ॲड.संतोष गिल्डा, डॉ.संजय पौळ, डॉ.महिंद्रकर, अतुल देऊळगावकर, अशोक धूत, राधेश्याम धूत, फुलचंद काबरा, बाळू भंसाळी, ओमप्रकाश सारडा, रवींद्र भुतडा, चंदुलाल बलदवा, नितीन कलंत्री अनेक उद्योजक- विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी ...

उंचावणे आणि त्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या क्रॅश कोर्समध्ये शासकीय माध्यमिक आश्रम शाळा दाभेरी, देहरे, विनवळ, न्याहाळे तसेच इतर सहा आश्रमशाळांमधील इयत्ता १२वी विज्ञान शाखेतील एकूण ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. विद्यार्थ्यांना सखोल अभ्यास, विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक तयारीची संधी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी या क्रॅश कोर्सचा जास्तीत जास्त लाभ घेऊन बारावी परीक्षेत गुणवत्ता वाढवण्यासाठी सातत्याने अभ्यास करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम पुढील शैक्षणिक वर्षांत अधिक व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार असून त्यामुळे आदिवासी भागातून अनेक गुणवत्ताधारक विद्यार्थी घडतील, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला.तसेच नीट (NEET) परीक्षेसाठी विशेष कोचिंगची गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘सुपर थर्टी’ बॅच सुरू करून स्वतंत्र मार्गदर्शन देण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आतापासूनच लक्ष्य निश्चित करून अभ्यासाला लागावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. या उपक्रमाचे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि चिकाटीवर अवलंबून असून अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी अत्यंत आवश्यक आहेत, असे प्रेरणादायी प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केलेनवीन वर्षामध्ये पालघर जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रामध्ये यशस्वी होणार असल्याचा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला.

## क्षयरोगाच्या लवकर निदानासाठी ...

क्षेत्र तसेच आयुष डॉक्टरांसोबत सातत्याने सहकार्य करत भारत सरकारच्या क्षयरोगमुक्त भारत या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी कटिबद्धतेने कार्य करत आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम रायगड जिल्ह्यात क्षयरोगाची लवकर ओळख, वेळेवर उपचार व प्रभावी अधिसूचना मजबूत करण्यास महत्त्वाची भूमिका बजावेल असे सांगण्यात आले व उपस्थित डॉक्टरांना प्रमाणपत्र देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या घडवून आणण्यासाठी डॉ गजेंद्र सिलीमकर, डॉ प्रशांत वाघमारे सरानी विशेष प्रयत्न केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास कुरणे यांनी केले आभार प्रदर्शन मारुती सूर्यवंशी (आयुष इंगेजमेन्ट ऑफिसर) यांनी केले.

## अवकाळी पावसाच्या सरींनी...

लागली आहे. दुसरीकडे शहरात सुरू असणारी अनिर्बंध बांधकामे, शहराच्या वेशीवर नियमबाह्य पद्धतीने सुरू असणारे रेडीमिक्स प्लांट यामुळे शहरातील हवा दूषित होऊन हवेचा निर्देशांकही सातत्याने घसरत होता. पावसाळ्यातील जुलै ते सप्टेंबर या कालावधीत समाधानकारक पातळीवर असणारा हवेचा निर्देशांक पाऊस थांबताच थेट अतिधोकादायक पातळीवर पोहोचला होता. बुधवारी २२८ पर्यंत हवेचा निर्देशांक पोहोचला होता. पण, नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गुरुवारी पहाटे बरसलेल्या अवकाळी पावसामुळे मात्र शहरातील वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. बुधवारी २२८ या अतिधोकादायक पातळीवर पोहोचलेला हवेचा निर्देशांक गुरुवारी थेट ९६ या समाधानकारक पातळीवर येऊन पोहोचला आहे. त्यामुळे नव्या वर्षाच्या सुरुवातीला नागरिकांना वायू प्रदूषणापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. ऐन हिवाळ्यात अचानक गुरुवारी पहाटे अवकाळी पाऊस पडल्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. सरत्या वर्षाला निरोप देऊन घरी परतणाऱ्या तसेच घराबाहेर मोकळ्या अंगणात नव्या वर्षाचा आनंद साजरा करणाऱ्या नागरिकांना पावसामुळे निवारा शोधण्यासाठी गडबड उडाली.

# ‘आमदारांनी तिकिटं विकली’; रवींद्र चव्हाण यांची गाडी थांबवून भाजप कार्यकर्त्याचा गोंधळ



**वसई : वार्ताहर**

वसईतील भाजपचा कार्यकर्ता मेळावा संपताच भाजपच्या एका जुन्या नाराज कार्यकर्त्यांने प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची गाडी थांबवून गोंधळ घातला. जुन्या कार्यकर्त्यांना डावलून काल परवा भाजप मध्ये दाखल झाले आहेत त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे येथील आमदारांनी तिकीट विकली असल्याचा आरोपही त्या कार्यकर्त्याने केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वसई विरार शहरात झालेल्या उलथापालथीनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. तर भाजप पक्षात एकामागून एक होणाऱ्या पक्षप्रवेशांमुळे भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला आहे. पण, पक्षातील तिकीट वाटपानंतर भाजपमधील कार्यकर्त्यांचा हा रोष प्रकर्षाने समोर येत आहे. समाजमाध्यमांवर होणारी टीका आणि कार्यकर्त्यांनी भरलेले अपक्ष अर्ज यामुळे भाजप नेत्यांकडून अशा नेत्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी गुरुवारी वसईच्या माणिकपूर येथे भाजपचा कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, निवडणूक मुख्य प्रभारी पूनम महाजन, खासदार हेमंत सावरा, आमदार स्नेहा दुबे पंडीत, आमदार राजन नाईक, जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील आणि भाजपचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यात भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विकास आणि भ्रष्टाचाराचा मुद्दा अधोरेखित करत कार्यकर्त्यांना महापालिका निवडणुकीसाठी सज्ज होण्याचे आव्हान केले. तर माजी खासदार आणि वसई विरार निवडणुक मुख्य प्रभारी पूनम महाजन यांनीही १०७ जागा जिंकून येण्याचा विश्वास व्यक्त करत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पण, हा मेळावा पार पडल्यानंतर मात्र रवींद्र चव्हाणांची गाडी अडवत भाजपच्या एका जुन्या कार्यकर्त्याने भाजप आमदारांवर गंभीर आरोप करत गोंधळ घातल्याची घटना घडली. मेळावा पार पडल्यानंतर प्रदेशाध्यक्ष रवींद्र जाण्यास निघाले गाडीत बसले असताना जूचंद्र येथील जुने कार्यकर्ते निशिकांत म्हात्रे यांनी त्यांच्या गाडी जवळ जाऊन निष्ठवंतांना डावलण्यात आल्या बाबत जाब विचारत गोंधळ घातला. १९८० पासून आम्ही भाजप पक्षात कार्यरत आहोत. पक्षात काल परवा आले आहेत त्यांनी उमेदवारी दिली आहे. प्रभाग २७ मध्ये सात महिन्यापूर्वी बविआ मधून आलेल्या धरेंद्र कुलकर्णी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. चाळ माफियांना ही उमेदवारी दिली असल्याचा आरोप म्हात्रे यांनी केला आहे. येथील नेत्यांनी ही उमेदवारीची तिकीट विकली असल्याचा आरोप त्यांनी केला. इथे आम्ही वसईत स्नेहा दुबे पंडित यांना आमदार म्हणून निवडून दिले त्यांनी ही आमचा घात केला असल्याचा आरोप त्यांनी केला. आम्हाला जो आमदार मिळाला आहे तो सावत्र आमदार मिळाला आहे असेही त्यांनी सांगत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांवर नाराजी व्यक्त केली. यावेळी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

# उदगीरमध्ये उपनगराध्यक्ष निवडीकडे राजकीय नजरा

## कोण बाजी मारणार? सभागृहत नगराध्यक्षासह नव्या २३ चेहऱ्यांना नेतृत्वाची संधी

**देवणी : शकील मनियार**




उदगीर पालिकेच्या निवडणुकीतील विजयाच्या गुलालाचा धुराळा खाली पडला आहे. नगराध्यक्षासह २३ नव्या चेहऱ्यांना सभागृहात नेतृत्वाची संधी मिळाली आहे. सर्वाधिक सदस्य संख्या राष्ट्रवादीची आहे. त्यानंतर भाजपची आहे. उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यपदी कोणाची वर्णी लागेल याकडे राजकीय नजरा लागून आहेत. निम्म्याहून अधिक सदस्यांना सभागृहात प्रथमच नेतृत्वाची संधी मिळाली आहे. नुतन नगरसेवक म्हणून ठिकठिकाणच्या सत्कार समारंभाला हजेरी लावणे अद्याप सुरूच असून पालिकेच्या उपाध्यक्षाच्या खुर्चीवर कोण विराजीत होईल याकडे राजकीय वर्तुळातील कार्यकर्त्यांच्या नजरा लागल्या आहेत. सभागृहात राष्ट्रवादी २०, भाजप १३, कॉंग्रेस ५ व एम आयएम ०२ असे पक्षीय बलाबल आहे. भाजप व राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या युतीत नगराध्यक्ष पद भाजपकडे आहे. तर प्रथेप्रमाणे उपाधक्षपद राष्ट्रवादीकडे राहील हे निश्चित आहे. शहरात मुस्लीम, लिंगायत, दलित व ओबीसी मतदार मोठया प्रमाणात आहे. त्यानुसार विचार केल्यास लिंगायत नगराध्यक्ष असल्यामुळे उपाध्यक्षाची संधी अन्य घटकास द्यावे लागेल. दलितांमधून राष्ट्रवादीत राजकुमार भालेराव हे २५ वर्षापासून सभागृहात आहेत. त्यांना सभागृहाचा व प्रशासकीय कामकाजाचा अनुभव आहे. ओबीसीतून अनील मुदाळे व मुसलीम समाजातून शेख समीर या दोघांनाही सभागृहातील कामकाजाचा अनुभव आहे. या तिघांच्या नावाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. आ. संजय बनसोडे हे दलित असून भविष्यातील मतांचे गणितानुसार उपाध्यक्ष अन्य समाज घटकास दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुदाळे कार्यक्षम असून या दाम्पत्याला नगरसेवकाची संधी मिळाली आहे. हे कारण पुढे करतील व शहरातील मुस्लीम समाज घटकास खुष करण्यासाठी सभागृहात मुस्लीम सदस्य संख्या जास्तीची असून त्यांना निमंत्रित करण्यासाठी म्हणून मुस्लीम सदस्यास उपनगराध्यक्ष दिले जावू शकते.

# भिवंडीत ४ लाख ४० हजारांची रोकड जप्त



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सुरू आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने साईबाबा तपासणी नाका परिसरात एक जानेवारी रोजी सायंकाळी ५.४५ वाजता च्या सुमारास एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. आचार संहिता पथक प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक एक चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. साईबाबा नाका येथे तपासणीदरम्यान चारचाकी वाहन क्रमांक एम एच.०५.ई व्ही.६६६७ या वाहनाची तपासणी करीत असताना वाहनात ४ लाख ४० हजारांची रोख रक्कम आढळून आली.वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे सदरची रक्कम कुठून आणली व कुठे चालवली व काय कामासाठी रक्कम घेतली आहे याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता सदरील वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाच्या निदर्शनास आणून दिली नाही.त्यामुळे पथकाने मोजणी व पंचनामा करून रोख रक्कम ४ लाख ४० हजार रुपये पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम मनपाचे लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

# ऑर्केस्ट्राबारवर पोलिसांची धाड; ७० जणांविरुद्ध गुन्हा दाखल; ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

दक्षिण तालुक्यातील कंदलगाव गावाच्या शिवारामध्ये असलेल्या पुष्पक ऑर्केस्ट्राबारमध्ये काही महिला तोकडे कपडे घालुन बिभत्सपणे अश्लील हावभाव व नृत्य करून डि.जे. वर नाचत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळाली. त्यावरून त्यांनी विशेष पथकास सुचना देऊन डान्सबारवर कारवाईचे आदेश दिले. त्या अनुषंगाने विशेष पथक मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीतील कंदलगाव येथील पुष्पक ऑर्केस्ट्राबार येथे कारवाई करीता गेले असता तेथे मिळुन आलेल्या बातमी प्रमाणे १२ महिला तोकडे कपडे घालुन बिभत्सपणे अश्लील नृत्य व हावभाव करूण डिजे च्या तालावर अश्लील नृत्य करीत असल्याचे व तेथील ग्राहक नृत्यांगनावर नोटा सदश्य कुपन उधळुन अश्लील हावभाव करून नाचताना मिळुन आले. तसेच समोर बसलेले काही लोक तसेच स्टेजच्या समोर देखील काही लोक बसले होते, ते नोटा सदश्य कुपन त्या महिलावर उधळत होते. त्या ठिकाणी एकुण १२ बारबाला मिळुन आल्या असुन ५५ ग्राहक तसेच पुष्पक ऑर्केस्ट्राबारचे चालक भारत राजाराम तांबे, रा. शिवाजी नगर, बाळे, सोलापूर व मालक रोहित पांडुरंग चव्हाण, रा. सोलापूर अशा एकुण ७० लोकांविरूध्द मंद्रुप पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुष्पक ऑर्केस्ट्राबार येथून ५७ लाख रूपये किमतीचे डि.जे. साहित्य, ऑर्केस्ट्राबार मधील साहित्य तसेच वाहने, मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई ही पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनामध्ये सहायक पोलीस अधीक्षक राहुल अतराम, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, सपोनि अनिल सनगल्ले, पोहेकॉ बिराजदार, पोहेकॉ. गोरे, पोकॉ.जाधव, पोकॉ.गणेश पाटील, महिला पोकॉ. धनश्री हुळळे, महिला पोकॉ. राऊत, मंद्रुप पोलीस ठाणेचे मनोज पवार व त्यांचे कर्मचारी यांनी कारवाई केली आहे.

कंदलगाव येथील ऑर्केस्ट्रा बारबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे अनेक तक्रार करण्यात आले होते. त्याकडे वारंवार दुर्लक्ष करण्यात आले. मात्र पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांना गोपनीय माहीती मिळाल्यावर व परीसरातील नागरीकांना या डान्सबारचे त्रास होत असल्याबाबत कळाल्यावर त्यांनी विशेष पथकास कारवाइचे आदेश दिले. पोलीस अधीक्षकांनी ३१ डिसेंबरचे मूहूर्त साधून पुष्पक डान्सबारवर धडाकेबाज कारवाई केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# ‘राजमाता जिजामाता’तर्फे मतदान जनजागृती



**लातूर : वार्ताहर**

महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या मतदान जनजागृती उपक्रमाला राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. ‘माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी व लोकशाही मजबूत करण्यासाठी मी आई-बाबाला मतदान करण्यास प्रवृत्त करणार’, असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी शिक्षक व कर्मचार्यांनी मतदानाची शपथ घेतली. लातूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर ‘स्वीप’ मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी विशेष मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या मार्गदर्शनात आणि प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींनी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, संजय गुरमे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आर. पी मुंडे आदी उपस्थित होते.

## स्नेहालय संस्थेची ३ दिवसीय सेवा संवर्धन कार्यशाळा संपन्न

# सेवाभावी रचनात्मक कार्यातून कार्यकर्त्यांनी प्रेरणा घ्यावी-अरुणा जगियासी




**विरार : वार्ताहर**

स्नेहालय संस्थेच्या सेवाभावी आणि रचनात्मक कार्याचा वटवृक्ष समाजातील हजारो निराधार वंचिताना मोलाचा आधार देत आहे. संस्थेच्या उभारणीत गिरीश कुलकर्णी आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे कष्ट आणि मेहनत मोठे आहे. स्नेहालयच्या या सेवाभावी आणि रचनात्मक कार्यातून कार्यकर्त्यांनी प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन जीवन आनंद संस्थेच्या विश्वस्त अरुणा जगियासी यांनी स्नेहालय मधील कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी केले. स्नेहालय संस्थेच्या वतीने दि. २६ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत अहिल्यानगर स्नेहालय प्रकल्प येथे ३ दिवसीय सेवा संवर्धन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत जीवन आनंद संस्थेचे कार्यकर्ते कु. राजीव भक्ती संदिप परब, भाईदास माळी, संपदा सुर्वे, शैलेंद्र कदम तसेच संस्थेच्या विश्वस्त श्रीम. अरुणा जगीयासी यांची सक्रिय उपस्थिती होती. ह्या कार्यशाळेत स्नेहालयचे संस्थापक गिरीश कुलकर्णी यांनी सामाजिक संस्थांमध्ये कार्यकर्ते कसे टिकवावे या विषयावर मार्गदर्शन केले. स्नेहालयचे विश्वस्त शशिकांत सातभाई यांनी सामाजिक संस्थांचे व्यवस्थापन, माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याविषयी सखोल माहिती दिली. श्रीम. रिमा अमरापूरकर यांनी जनसंपर्क कसा वाढवावा, श्रीम. प्रीती गोखले यांनी देणगीदार कसे वाढवावेत व दीर्घकाळ कसे टिकवावेत यावर मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान आर्थिक व्यवस्थापन या विषयावरही उपयुक्त सत्र घेण्यात आले. या कार्यशाळेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून सहभागी कार्यकर्त्यांना हिम्मत ग्राम, मानस ग्राम, अनामप्रेम, सेवावस्ती, बालभवन आणि स्नेहांकुर या विविध प्रकल्पांना भेट देण्याची संधी मिळाली. या भेटींमुळे स्नेहालयच्या प्रत्यक्ष कार्यपद्धती, सेवा मॉडेल आणि पुनर्वसन प्रक्रियेचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले. कार्यशाळेमुळे सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या कार्यकर्त्यांना व्यवस्थापन, जनसंपर्क, निधी संकलन व तंत्रज्ञानाचा उपयोग याबाबत नवी दिशा व प्रेरणा मिळाली, अशी भावना सहभागी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# नशिराबादमध्ये ‘मनीयार बिरादरी’च्या ३ नगरसेवकांचा दणदणीत विजय

**जळगाव : वार्ताहर**



नशिराबाद नगरपरिषद निवडणुकीत मनीयार बिरादरीने ऐतिहासिक वर्चस्व सिद्ध करत ३ नगरसेवक निवडून आणले असून, या विजयाबद्दल जळगाव जिल्हा मनीयार बिरादरीतर्फे नशिराबाद येथे जाऊन नवनिर्वाचित नगरसेवकांचा जाहीर सन्मान व सत्कार करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत वार्ड क्रमांक ३ मधून हिना बी मोहम्मद रईस कासार, वार्ड क्रमांक ९-अ मधून मनियार कमरुन्निसा ९ ब प्रभागातून आसिफ शेख यांची नगरसेवकपदी निवड झाली आहे. विशेष म्हणजे हे तिन्ही नगरसेवक एम आय एम, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांच्या आघाडीतून निवडून आले असून, यामुळे मनीयार बिरादरीचा राजकीय प्रभाव अधिक ठळकपणे पुढे आला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल जळगाव जिल्हा मनियार बिरादरीचे अध्यक्ष फारुक शेख, उपाध्यक्ष सैयद चांद, ताहेर शेख, अब्दुल रऊफ, अख्तर शेख, वसीम शेख, अल्ताफ शेख व पदाधिकाऱ्यांनी तात्काळ नशिराबाद येथे जाऊन नवनिर्वाचित नगरसेवकांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी नशिराबाद बिरादरीचे रईस कासार, फिरदौस मनीयार फजल कासार, रियाजुद्दीन शेख, इस्माईल शेख, करीम शेख, अब्दुल रईस, अन्वर शेख आदींची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाध्यक्ष फारुक शेख यांनी सांगितले की मनीयार समाज आता केवळ मतदानापुरता मर्यादित नसून निर्णयक्षम नेतृत्व देणारी ताकद बनली आहे, पुढे बोलताना शेख यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, निवडून आलेल्या नगरसेवकांनी प्रामाणिकपणे काम करून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडावेत, विकासकामांमध्ये कोणताही भेदभाव न करता मनीयार समाजासह सर्व घटकांना न्याय द्यावा. या विजयामुळे नशिराबादमध्ये मनीयार बिरादरीच्या राजकीय वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, येणाऱ्या काळात समाज अधिक संघटित व आक्रमकपणे हक्कासाठी उभा राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ‘पीएम जनमन योजनेच्या माध्यमातून कातकरी समाजाला नवे बळ’



**पालघर : वार्ताहर**

आदिवासी विकासाच्या दिशेने पालघर जिल्ह्यात एक महत्त्वाचे पाऊल टाकत पीएम जनमन योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या खोच (पिंपळपाडा -शिरसोलीचा पाढा) येथील कातकरी बहुउद्देशीय केंद्राला जिल्हाधिकारी डॉ .इंदु राणी जाखड यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीत त्यांनी स्थानिक कातकरी समाजातील महिला व ग्रामस्थांशी थेट संवाद साधत, या केंद्राच्या माध्यमातून होणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा मार्ग स्पष्ट केला. या केंद्रामुळे कातकरी समाजातील पुरुष व महिलांना स्थानिक पातळीवर रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्यविकास तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी महिलांच्या अडचणी समजून घेत त्यावर मार्गदर्शन करताना, या केंद्राचा प्रभावी वापर केल्यास समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडू शकतो, असे प्रतिपादन केले. ग्रामीण भागात अशा बहुउद्देशीय केंद्रांची साखळी उभी राहिल्यास आदिवासी बांधवांचा आर्थिक कणा मजबूत होईल, असे मनोगत व्यक्त करत जिल्हाधिकारी डॉ इंदु राणी जाखड यांनी केंद्राच्या दर्जेदार बांधकामाबाबत समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्वतः गावात येऊन संवाद साधल्याने आम्हाला आत्मविश्वास मिळाला असून विकासाच्या नव्या आशा निर्माण झाल्या आहेत, असे स्थानिक महिलांनी आनंदाने सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी उपस्थितांना नव वर्षाच्या शुभेच्छा देत, कातकरी बहुउद्देशीय केंद्र हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# सेवानिवृत्त सुरेश बोरोळे यांचा सत्कार



**देवणी : वार्ताहर**

बोरोळ तालुका देवणी येथील रहिवासी रावणगाव ता.उदगीर येथील प्राथमीक शाळेत रुजू असलेले मु.अ. सुरेश बोरोळे शासनाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले यांचा सेवानिवृत्ती व सेवापुर्ती गुणगौरव सोहळा संपन्न झाला. शिक्षक बोरोळे यांचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सहपत्नीक सत्कार व निरोप समारंभ देण्यात आला यावेळी सत्कार करताना दवणहिप्परगा शाळेतील मुख्याध्यापक राजकुमार मुळखेडे, माझी उपसरपंच सुरेश पाटील, संजय खुळे, प्राचार्य नवनाथ खुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, शिवराज वाकडे, चंद्रकांत गरड, दत्ता हुरुचनाळे, व्यंकट आयनिले, शिवाजी बिरादार, सोपान काका सुर्यवंशी, श्रीकांत बिरादार प्रा राहुल बालुरे, शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड, प्रमोद जवळदापके सह अदिंची उपस्थिती होती.

# वाडा-भिवंडी महामार्गावरील मुसारणे फाट्यावर अपुऱ्या रस्त्यामुळे गंभीर अपघात; दुचाकीस्वाराचा पाय निकामी

**वाडा : वार्ताहर**



नवीन वर्षाची सुरुवातच अपघाताने झाली असून कामावरून घरी परतणाऱ्या दुचाकी स्वारकचा अपघातात पाय निकामी झाल्याची दुर्दैवी घटना ग१ जानेवारी सायंकाळी ५:१५ वाजता घडली आहे. या अपघाताबाबत वाडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. वाडा-भिवंडी महामार्गावरील मुसारणे फाट्यावर रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे झालेल्या गंभीर अपघातात दुचाकीस्वार प्रसाद महाडीक यांचा एक पाय गुडघ्यापासून तुटला आहे. रस्त्याचे काम करणाऱ्या ईगल इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदार कंपनीच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेजबाबदार पणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. वाडा-अंबाडी मार्गावर असलेल्या मुसारणे फाट्याजवळ रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू असून ते अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. रस्त्यावर मोठे खड्डे, खचलेले कडे तसेच उंचसखल भाग निर्माण झाले असून, या ठिकाणी कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे अपूर्ण कामाच्या ठिकाणी कोणतेही सूचना फलक, बॅरिकेड्स अथवा धोक्याची पूर्वसूचना देणारी व्यवस्था नसल्याने वाहनचालकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. दुचाकीस्वार प्रसाद महाडीक (रा.कुडूस) हे गाळा कंपनीत कामाला होते, ते कामावरून सायंकाळी ५:१५ वाजण्याच्या सुमारास घरी परतत असताना त्यांचा अपघात झाला. वाडा-भिवंडी मार्गावर वाहनांची सतत वर्दळ असलेल्या या मार्गावरून जात असताना त्यांची दुचाकी खचलेल्या रस्त्याच्या भागात घसरली. याच वेळी पाठीमागून येणाऱ्या व वळण घेत असलेल्या ट्रकच्या (टेलर) चाकाखाली त्यांचा डावा पाय सापडल्याने पायाला गंभीर दुखापत होवून निकामी झाल्याची माहिती मिळत आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमी महाडीक यांना रुग्णालयात दाखल केले.

05 TO 11 JANUARY 2026 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/3/2026 9:31 PM Page 1



# रेणापूरच्या लोकनियुक्त भाजपाच्या नगराध्यक्षा शोभा शामराव अकनगिरे यांनी स्वीकारला पदभार



**रेणापूर : वार्ताहर**

तब्बल गेली तीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या लोकनियुक्त भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्षा शोभाताई शामराव अकनगिरे यांनी आज गुरुवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असे प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक अभिषेक आकनगिरे यांनी बोलून दाखविले. रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी गेल्या २० डिसेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीत लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष उमेदवारासह दहा नगरसेवक बहुमताने विजयी होऊन रेणापूर नगरपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाचा झेंडा फडकला. नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष शोभा शामराव आकनगिरे यांचा पदग्रहण सोहळा गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी संपन्न झाला. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, अहमदपूरचे प्रतीक लंबे, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील, ज्योती वलांडे, अंकुश फड, अमोल बाजुळगे, महमूद शेख या अधिकारी कर्मचाऱ्यासह नवनिर्वाचित नगरसेवक अभिषेक आकनगिरे, सुमन मोटेगावकर, सुनिता बसतापुरे, दत्ता सरवदे, धरती गाडे, रबियाबी शेख, हुसेना शेख, खैरोनिसा आत्तार, ज्योती चव्हाण, वाहेद शेख, प्रदीप राठोड त्याचबरोबर अधिकारी, भाजपचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर अनेकांनी शोभाताई आकनगिरे यांचे पुष्पगुच्छ देऊन पेढा भरून अभिनंदन केले. यावेळी नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक अभिषेक आकनगिरे म्हणाले की, गेल्या तीन वर्षात प्रशासकीय कार्यकाळात नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. केंद्र आणि राज्यातील भाजपा शासनाच्या माध्यमातून आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणू. येणारी पाच वर्षे ...पान ६ वर

# मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य -आयुक्त मानसी मीना



**लातूर : वार्ताहर**

मतदानाचा दिवस हा केवळ सुट्टी म्हणून मौजमजा करण्याचा दिवस नसून, तो एक राष्ट्रीय उत्सव म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्याचा दिवस आहे. लोकशाहीची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी तरुण वर्गामध्ये मतदान करण्याची 'क्रेझ' निर्माण झाली पाहिजे, असे परखड प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी मीना यांनी केले. लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर, दयानंद कला महाविद्यालय येथे 'स्वीप' (SVEEP) अंतर्गत आयोजित मतदान जनजागृती अभियानात त्या मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना श्रीमती मानसी मीना यांनी मतदारांमधील उदासीनता दूर करण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, केवळ सुट्टीचा आनंद घेण्यापेक्षा लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः मतदान करण्यासोबतच आपल्या घरातील आणि परिसरातील सर्व पात्र मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करून एक सजग नागरिक म्हणून आपली भूमिका बजावावी. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले की, तरुणांनी मतदान प्रक्रियेत केवळ मतदार म्हणून नव्हे, तर सक्रिय घटक म्हणून सहभागी ...पान ६ वर

# कर्मवीर भाऊराव विद्यालयाच्या मयुरी गावडे जिल्ह्यात द्वितीय, राज्यात झेप : रांगोळीमिती



**वसई : वार्ताहर**

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस.पी. जुनिअर कॉलेज, जूचंद्र येथील मयुरी किशोर गावडे (सहशिक्षिका) यांनी राबविलेल्या भूमिती विषयातील नावीन्यपूर्ण शैक्षणिक नवोपक्रम 'रांगोळीमिती : नक्षीतील भूमिती' याने जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सदर नवोपक्रमास जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून त्याची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. हा नवोपक्रम शाळेतील गणित विषयाच्या अध्यापनात सर्जनशीलता व अनुभवाधारित पद्धती यांचा प्रभावी वापर करतो. रांगोळीच्या माध्यमातून भूमितीय संकल्पना विद्यार्थ्यांना सोप्या व रंजक पद्धतीने समजावून 'भूमिती अवघड नाही, सुंदर आहे' हे पटवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या यशस्वी नवोपक्रमाचे मार्गदर्शन विद्यालयातील गणित विषयाच्या अध्यापिका मयुरी किशोर गावडे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भूमितीतील आकार, सममिती, कोन व रचना प्रत्यक्ष रांगोळीच्या नक्षींमधून साकार केल्या. या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सन्माननीय विनय पाटील, विद्यालयातील मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप सर, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकवर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक गौरवशाली अध्याय जोडला गेला आहे.

## पालघर जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'पुस्तक पेटी' भेट उपक्रम

# पुस्तके वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि बौद्धिक विकासाला चालना -डॉ.इंदु राणी जाखड





**पालघर : वार्ताहर**

पुस्तक पेटी भेट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनाची गोडी वाढून पुस्तके वाचनामुळे शैक्षणिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी व्यक्त केला. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर मराठी वाचनसंस्कृती अधिक समृद्ध करण्याच्या उद्देशाने मनोविकास ग्रंथोत्सव व पालघर साहित्य व कला प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच निऑन फाउंडेशनच्या विशेष सहकार्याने पुस्तक पेटी भेट उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, तहसीलदार सचिन भालेराव, पालघर साहित्य व कला प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश लवेकर, सचिव अमोल पाटकर, खजिनदार राहुल ठाकूर, निऑन फाउंडेशनच्या संध्या पाटील, राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रमोद पाटील, तसेच विविध शाळांमधील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा रोडखड, दाभोण (पिलेना पाडा), टेम्भीखोडावे, घाटीम, कर्दळ, आर्यन, अभिनव विद्यालय विराथन बुद्रुक तसेच आंभाण-मनोर येथील जिल्हा परिषद व संस्थेच्या शाळांना वाचनीय पुस्तकांच्या पेट्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि ज्ञानविश्व अधिक व्यापक व्हावे, या हेतूने ही पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. पुस्तक पेट्यांचे वितरण करताना जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पुस्तक पेटीतील पुस्तके केवळ कपाटात बंद करून न ठेवता विद्यार्थ्यांना मुक्तपणे वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांचा वैचारिक व बौद्धिक विकास निश्चितच घडतो, असे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी यावेळी सांगितले.

# पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर भव्य परेड, प्रात्यक्षिके व प्रशासकीय आढावा



## नांदेड पोलीस परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे लातूर जिल्ह्याचे वार्षिक परीक्षण व तपासणी दौरा

**देवणी : शकील मनियार**

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक (DIG) शहाजी उमाप हे वार्षिक परीक्षण, तपासणी व प्रशासकीय आढाव्याच्या अनुषंगाने आठ दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर लातूर जिल्ह्यात उपस्थित होते. या दौऱ्याचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथील प्रशस्त मैदानावर लातूर जिल्हा पोलीस दलाची भव्य परेड तसेच विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. या परेडचे परीक्षण पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. परेडचे संचालन. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी अत्यंत शिस्तबद्ध, काटेकोर व नियोजनबद्ध पद्धतीने केले. परेडमध्ये सहभागी पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपली शिस्त, एकात्मता, शारीरिक क्षमता, प्रशिक्षणाची गुणवत्ता व कर्तव्यनिष्ठा यांचे प्रभावी दर्शन घडविले.

परेडनंतर लातूर जिल्हा पोलीस दलाकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यामध्ये मॉब डिसपर्सल पथक, किट परेड, लाठी ड्रिल, स्कॉड ड्रिल, वाद्य पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथक यांचा समावेश होता. आपत्कालीन परिस्थिती, जमाव नियंत्रण, दंगल नियंत्रण, दहशतवादी कारवाया तसेच संशयास्पद साहित्याच्या शोध व नाशासाठी पोलीस दल किती सज्ज, सक्षम व प्रशिक्षित आहे, याचे सविस्तर व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सादरीकरण करण्यात आले.मा.श्री. शहाजी उमाप यांनी या सर्व प्रात्यक्षिकांची बारकाईने पाहणी करून पोलीस दलाच्या सज्जतेबाबत समाधान व्यक्त केले.

**वार्षिक प्रशासकीय परीक्षण दौरा व सखोल आढावा**

२६ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर जिल्ह्याचा सखोल, सर्वांगीण व प्रत्यक्ष वार्षिक प्रशासकीय दौरा पूर्ण केला आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांना भेटी देऊन पोलीस ठाण्यांचे दैनंदिन कामकाज, अभिलेखांची पडताळणी, शस्त्रागाराची पाहणी, मनुष्यबळ व्यवस्थापन तसेच प्रलंबित व गंभीर गुन्ह्यांच्या तपासाची सद्यस्थिती यांचा सविस्तर आढावा घेतला. गंभीर ...पान ६ वर

# बाई-काकाजी पॉलिमर्स लि.कंपनीचा लिस्टिंग समारंभ संपन्न




**लातूर : वार्ताहर**

येथील बाई-काकाजी पॉलिमर्स लि. या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओधारक कंपनी होण्याचा मान पटकावला असून या कंपनीचा लिस्टिंग समारंभ लातूरच्या कार्निव्हल रिसॉर्टमध्ये शानदार सोहळ्यात पार पडला. यावेळी राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी मंत्री आ.अमित देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलन आणि बाई-काकाजी यांच्या प्रतिमेच्या अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी बाँबे स्टॉक एक्सचेंजचे राम गिरी, बँकिंग पार्टनर अभिजित पांडे, बाई-काकाजी ग्रुपचे प्रमुख बालकिशन मुंदडा, नरसिंगदास मुंदडा, दिलीप मुंदडा, हरिकिशन मुंदडा, प्रमोद मुंदडा, आकाश मुंदडा,अक्षय मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. एखाद्या कंपनीचे एक्सचेंजवर सार्वजनिकरित्या व्यवहार होण्याचा हा लिस्टिंग समारंभ मुंबई सारख्या महानगरात होत असतो. मात्र, बाई-काकाजी पॉलिमर्स लि.चा हा सोहळा विशेष करून लातूर शहरात घेण्याची आग्रही मागणी बाई-काकाजी समूहातर्फे लावून धरण्यात आल्याने हा सोहळा लातूरच्या उद्योजकीय विश्र्वात प्रथमच लातुरात पार पडला. या सोहळ्याची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आ.अमित देशमुख यांच्या हस्ते घंटा वाजवून करण्यात आली. यावेळी आपले ...पान ६ वर

# पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांची नवीन वर्षाची सुरुवात आदिवासी विद्यार्थ्यांसोबत



**पालघर : वार्ताहर**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी नवीन वर्षाची सुरुवात आदिवासी विद्यार्थ्यांसोबत करत शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संदेश दिला. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष क्रॅश कोर्सला भेट देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार येथील प्रकल्प अधिकारी डॉ. अपूर्वा बासुर यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, पळसुंदे ता. मोखाडा, येथे हा क्रॅश कोर्स आयोजित करण्यात आला असून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा ...पान ६ वर

# क्षयरोगाच्या लवकर निदानासाठी आयुष डॉक्टरांचे प्रशिक्षण शिबिर




**देवणी : वार्ताहर**

ग्लोबल फंडच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या SSHKTI प्रकल्पाअंतर्गत HLFPPT यांच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम जिल्हा क्षयरोगअधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्या मार्गदर्शनानुसार व (NTEP)च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार क्षयरोग नियंत्रणात आयुष डॉक्टरांची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम २८ डिसेंबर २०२५ रोजी रोटरी क्लब हॉल, पनवेल, रायगड येथे यशस्वीरीत्या पार पडला. संभाव्य क्षयरोग रुग्णांची आयुष डॉक्टरांकडून लवकर ओळख करून वेळेत तपासणी व उपचारासाठी संदर्भ देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रशिक्षणात एकूण ३१ आयुष डॉक्टरांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रशिक्षण सत्रांदरम्यान क्षयरोगाची मूलभूत माहिती, लवकर निदानाचे महत्त्व, रुग्ण संदर्भ प्रक्रिया, निक्षय (Ni-kshay) पोर्टलद्वारे क्षयरोग अधिसूचना, तसेच NTEP अंतर्गत आयुष डॉक्टरांसाठी उपलब्ध प्रोत्साहन योजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण सत्रांचे संचालन डॉ.सरोज चौधरी व विकास कुरणे (HLFPPT) यांनी केले. NTEP तर्फे सतीश दंतराव कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच HLFPPT तर्फे संकेत गायकवाड, मारुती सूर्यवंशी व सुश्री वैष्णवी दालवाले यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. प्रशिक्षणादरम्यान सहभागी डॉक्टरांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला व प्रशिक्षण उपयुक्त व ज्ञानवर्धक असल्याचे मत व्यक्त केले. SSH-KTI प्रकल्पाच्या माध्यमातून HLFPPT, सार्वजनिक व खाजगी आरोग्य ...पान ६ वर

# अवकाळी पावसाच्या सरींनी नववर्षाची सुरुवात



**वसई : वार्ताहर**

वसई विरार शहरात गुरुवारी पडलेल्या अवकाळी पावसाच्या सरींनी नववर्षाची सुरुवात झाली आहे. यामुळे नागरिकांची जरी तारांबळ उडाली असली तरी बुधवारी २२८ पर्यंत पोहोचलेला हवेचा निर्देशांक थेट ९६ वर येऊन पोहोचला आहे. अतिधोकादायक पातळीवर पोहोचलेल्या प्रदूषणाच्या पातळीत मोठी घट झाली आहे. वसई विरार शहरात थंडीचा पारा चांगलाच चढला आहे. डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात पहाटे आणि संध्याकाळच्या सुमारास पडणाऱ्या थंडीने नागरिकांना हुडहुडी भरली आहे. पण, वाढत्या थंडीसह शहरात गेल्या काही महिन्यात धूळप्रदूषण, हवा प्रदूषणातही मोठी वाढ झाली होती. पावसाळ्यात रस्त्यावर साचलेल्या चिखलाचे धुळीत रूपांतर होऊन ती आता वातावरणात पसरू ...पान ६ वर